शनिवार । २ फेब्रुवारी १९८० । ७५ पैसे

# माणूस

"एक विचार मला भयंकर अस्वस्थ करतो आहे. आर्यांपासून हूण, ग्रीक, इस्लामी टोळीवाले हिंदुस्थानवर चालून आले ते या खैबरखिंडीतूनच. उद्या रशियाही त्याच 'सिलकरूट'चा वापर करणार आहे का?"




काबूलवार्ता : पृष्ठ ११

# हात आणि पंजा

श्री. ग. मा.

नवे केंद्रीय वीज व पाटबंधारे मंत्री श्री. ए. बी. ए. घनीखान चौधरी यांनी कलकत्त्यात "डाव्या कम्युनिस्टांची प. बंगालमधील राजवट बंगालच्या उपसागरात बुडवून टाकल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही" असे विधान केल्याचे वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेले आहे. (केसरी, २६ जानेवारी)

कुणाही लोकशाहीवाद्याने हे घडू देता कामा नये. यासाठी आतापासूनच जनमत प्रखरपणे व्यक्त करण्याचा उद्योग सुरू व्हायला हवा आहे.

प्रश्न राजवट डावी आहे की उजवी आहे हा नाही. प्रश्न ती लोकशाही मार्गाने जर सत्तेवर आलेली असेल तर तिला टिकू द्यायचे की नाही, हा आहे. जोवर अशी राजवट नित्य व्यवहारात लोकशाहीची, मान्य संकेतांची पायमल्ली करीत नसेल, जर अशा राजवटीत कायद्याला आणि सुव्यवस्थेला धोका निर्माण झालेला नसेल तर अशा राजवटी उलथून टाकण्याचा मनमानी अधिकार केंद्राला बहाल करणे लोकशाही परंपराना धरून होणार नाही. घटनेच्या मूळ तत्त्वांशीही हे करणे विसंगत ठरेल. केरळमधील पहिली कम्युनिस्ट राजवट, नंबुद्रिपादांचे सरकार इंदिरा गांधींनी, नेहरूंची संमती मिळवून भल्याबुऱ्या मार्गांनी पाडले. आता त्यांचे चिरंजीव संजय गांधी, चौधरीमहाशयासारख्यांना हाताशी धरून, माताजींची संमती मिळवून किंवा गृहीत धरून केरळचाच कित्ता गिरवू पाहत असतील तर त्याना वेळीच रोखणे आवश्यक आहे. अशा पाडापाडीच्या खेळामुळे जो वर्गसंघर्ष नेहरूंनी दूर ठेवला तो भडकू लागेल व शांततेच्या लोकशाही मार्गाने समाजवाद या देशात आणण्याचा मार्ग आपल्याला कायमचा सोडून द्यावा लागेल. वर्गसघर्ष पेटवून क्रांती करणे, समाजवाद आणणे हा मार्ग भारतातील कम्युनिस्ट चळवळीनेही जवळजवळ सोडून दिल्यासारखाच आहे. या विचारांशी बांधिलकी असणाऱ्यांच्या लिहिण्याबोलण्यात जहालपणा वगैरे असला तरी प्रत्यक्ष आचरणात मात्र ही मंडळीही मध्यममार्गीच बनलेली आहेत. नक्षलवादी पद्धतीचे उठाव थंडावलेले आहेत व बरेच नक्षलवादी गट चक्क निवडणुकीत वगैरे भागही घेऊ लागलेले आहेत. मार्क्सवादी तत्त्वज्ञानातही पुनर्विचारांची सारखी भर पडत आहे. रक्तरंजित क्राती, कामगारांची हुकूमशाही वगैरे मार्क्सवादी कल्पना आता प्रगत देशातून टाकावू ठरत आहेत. इकडे अजून काही काळ त्यांना मागणी राहिली तरी पहिला जोम ओसरला आहे. विज्ञानयुगामुळे सगळेच बदलते आहे तसा मार्क्सवाद आणि मार्क्सवादीही का बदलणार नाहीत ? दोन प्रातात त्यांची राजवट लोकशाही पद्धतीने अस्तित्वात आलेली आहे. तिची वाटचाल लोकशाही मार्गाने चालू आहे तोवर ढवळाढवळ करून त्यांना उलथवणे हे शहाणपणाचे कृत्य ठरणार नाही. जर विषमता आणि दारिद्र्य वाढले तर अशा राजवटी कोसळवून कम्युनिस्टांची आगेकूच थांबविता येत नाही, हे चीन-व्हिएतनामच्या उदाहरणांवरून सिद्ध झालेले आहे. चँग-कै-शेखने जो अदूरदर्शीपणा केला तोच संजय-इंदिरा करणार असतील तर शेवटही तसाच होईल. असा शेवट व्हायला नको असेल तर केरळ-बंगाल राजवटीना बुडविण्याचे संजयादिकांचे डाव वेळीच मोडून काढले पाहिजेत, त्यांना जनमताचा आधार मिळणार नाही, एवढे तरी लोकशाहीवाद्यानी पाहिले पाहिजे. शक्यता आहे की, जे केवळ उथळ राष्ट्रवादी आहेत, जे केवळ कम्युनिस्टांच्या द्वेषाने आंधळे झालेले आहेत त्यांना संजय गांधीचा कम्युनिस्ट विरोध एकदम आवडू लागेल. पण असे शॉर्टकट घेऊन कम्युनिझमला थोपविता येत नाही असा सर्व ठिकाणचा अनुभव आहे. परिस्थिती बदलणे, कम्युनिस्ट आचारविचार अप्रस्तुत व गैरलागू आहेत अशी लोकाची खात्री पटणे हाच कम्युनिझम रोखण्याचा राजमार्ग आहे. या मार्गावरून गांधी-नेहरू गेले, विनोबा-जयप्रकाश गेले व नागरधारी शेतकऱ्याला स्थिरपद करून हेच कार्य साधण्याचा जनता पक्षाचाही प्रयत्न होता पण चरणसिंगाचा मध्यम किसान आणि जनसंघामागे उभा असलेला शहरी मध्यमवर्ग याच्या मुळात परस्परविरोधी असणाऱ्या कारण (एक मुख्यत: उत्पादक व दुसरा ग्राहक!) हितसंबधाचा मेळ बसला नाही व जनता पक्षाचा मध्यममार्गी प्रयोग फसला. हा प्रयोग फसला म्हणून तळचे वर्ग आणि वरची पंचतारांकित वर्तुळे यांची


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : छत्तिसावा
२ फेब्रुवारी १९८०
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी ।
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

हातमिळवणी होऊन इंदिरा गांधी सत्तेवर आल्या. त्या काँग्रेसच्या मध्यममार्गाने गेल्या तर द गॉल ठरू शकतील. न गेल्या, संजयादिकांनी त्याना जाऊ दिले नाही तर मध्यममार्गाची धुरा वाहण्याचे ऐतिहासिक कार्य जनता पक्षाला पुन्हा एकदा करावे लागणार आहे. ग्रामीण आणि शहरी मध्यमवर्ग यांच्या हितसंबंधाची नीट सांगड घालणे, कालानुरूप आचारविचारांचा नवा मेळ जमवणे, हे सोपे काम नाही काँग्रेस टिळकाच्या काळापासून हे काम करीत आलेली होती. हा वारसा जनता पक्षाने आत्मसात करून पुढे वाढवत नेला तर त्याला भवितव्य जरूर आहे. अशा मध्यममार्गी वाटचालीत सहभागी व्हायचे की, वर्गसंघर्ष पेटवत राहून एखादा हुकुमशाही पंजा मानगुटीवर ओढवून घ्यायचा याचा निर्णय कम्युनिस्टभाईंनी करायचा आहे लोकशाहीवाद्यानी, मध्यममार्गाचे प्रतिपादन करणाऱ्यानी मात्र शंभर फुले फुलू देण्याचेच धोरण प्रामाणिकपणे अंगिकारायला हवे. कारण स्वातंत्र्य आणि भाकरी या दोन्ही गोष्टी मध्यममार्गीयानी सारख्याच महत्त्वाच्या मानलेल्या असतात. त्यानी असा विचार करावा की, हरयानासारखे 'विनोदी' राज्य जर या देशात चालू शकते तर बंगालीबाबूचे एखादे 'गंभीर' राज्य, ते जोवर घटनेनुरूप चालू आहे तोवर चालू असण्यात काय गैर आहे? पन्नास वर्षात ज्याना बंगाल–केरळच्या बाहेर पडता आले नाही ते आपणहून यापुढे हिंदुस्थान व्यापतील ही शक्यता फार कमी आहे. याचे मुख्य कारण त्याना भारताच्या मध्यममार्गी प्रवासाचे आकलनच अद्याप झालेले नाही, हे आहे. पण उद्या त्याचा विनाकारण छळ होऊ लागला, त्यांच्या राजवटी गैरमार्गाने उलथवून टाकण्यात आल्या तर परिस्थिती बदलू शकेल. म्हणून पंजा रोखला पाहिजे. हाताचे हे रूपातर टाळले पाहिजे. □

# सप्रेम नमस्कार

□ २९ डिसेंबर १९७९ च्या 'माणूस'च्या अंकात 'साहित्यिक राजकारणापासून अलिप्त राहू शकत नाही' या मथळ्याखाली प्रा य. दि फडके याची मुलाखत आहे तिच्यात 'आणीबाणीच्या काळात साहित्यिक विचारवंत काही न करता गप्प बसले' हे माझे (दुर्गा भागवतांचे) विधान असून ते अतिव्याप्त आहे असे य. दि. (फडके) म्हणतात. एक तर असे विधान लेखी वा तोंडी मी कधीही केलेले नाही. आणीबाणीतली माझी भाषणे प्रसिद्ध झाली आहेत. त्यातही हे विधान नाही. असल्यास य. दि. फडके यांनी उदाहरण देऊन स्पष्ट करावे. माझी (दुर्गा भागवतांची) 'भूमिका' ही आहे व ती 'एकेरी' आहे असा समज करून य. दि. फडके यांनी आपला प्रपंच माडला आहे. जी माझी 'भूमिका' म्हणून य. दि. फडके म्हणतात, तो त्याचा समज आहे. असा समज माझ्याविषयी कुणी करून घेतल्यास त्याला मी काय करणार? साहित्यिकांवर टीका लोकांनी केली. श्री. पु. ल. देशपांडे, द. मा. मिरासदार, जयवंत दळवी वगैरे अनेकांची मी स्तुती केल्याचेही मला आठवते. य. दि. फडक्याना ते आठवत नाही. त्याला मी काय करणार? असाच सूर आणीबाणीनंतरच्या माझ्या पुण्याच्या साहित्य परिषदेतल्या भाषणावर 'सकाळ'मध्ये पत्र लिहून श्री. प्रभाकर पाध्ये यांनी लावला होता व त्याला तेव्हा मी उत्तरही दिले होते.

'माणूस'च्या याच अंकातल्या मुलाखतीत मी सर्वसामान्य प्रक्रिया प्रगट केली. व त्याचे कारण हे होते की, सर्व तऱ्हेचे लोक 'तुम्ही सगळ्या साहित्यिकाना जनता पक्षाविषयी सहानुभूती निर्माण करून इंदिरा गांधी व कुटीर याच्याविरुद्ध लिहायला व बोलायला आवाहन का करीत नाही' असे म्हणत होते. जयवंत दळवी, द. मा. मिरासदार, गो. नी. दांडेकर वगैरे थोडे साहित्यिक हे कार्य आपणहूनच मोठ्या ईर्षेने करीत होते. पण बहुसंख्य, निदान त्या मुलाखतीच्या दरम्यान तरी सर्वांनाच स्वस्थ दिसत होते; आणि त्याच परिस्थितीला उद्देशून मी हे उत्तर दिले होते. माझी व य. दि. फडके याची अशा दोन्ही मुलाखती 'माणूस'च्या एकाच अंकात आलेल्या आहेत म्हणून हा खुलासा. पण य. दि. फडके यांचे विधान तर या मुलाखतीच्या आधीचे आहे. तेव्हा राजकारण व समाजकारण याचा विद्यापीठात व्यवसाय करणारे प्राध्यापक व संशोधक जर अशा अपुऱ्या समजावर माझ्या न केलेल्या विधानाबद्दल, हे विधान इतरावर अन्याय करणारे आहे, असे म्हणतात, याला काय म्हणावे?

अर्थात् प्रा. फडके याना आणीबाणीतले आपले कर्तृत्व स्पष्टपणे मांडण्यासाठी माझ्या या तथाकथित भूमिकेचा मोठा उपयोग झाला आहे. एवढ्या मोठ्या काळ्याकुट्ट पडद्यावर त्याचे पांढरे शुभ्र कर्तृत्व चंद्रकलेसारखे खूपच उठून दिसते.

**दुर्गा भागवत**

१५ जानेवारी ८० मुंबई

□ आपल्या ताज्या माणूस दि. १९-१-८० च्या अंकात डॉ. शरद अभ्यंकराचा जो लेख प्रसिद्ध केला आहात त्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद! अंधःश्रद्धेवर हल्ला चढवणारे असेच माहितीपूर्ण लेख आपण वरचेवर प्रसिद्ध करावेत ह्या बाबतीत सातत्याने प्रयत्न होत नाहीत ही दुर्दैवाची गोष्ट म्हटली पाहिजे आपले मान्यवर स्तंभलेखक श्री. दि. बा. मोकाशी यांना म्हणावं पुन्हा

एकदा तुम्ही त्या सुप्रसिद्ध ज्योतिषांकडे संध्याकाळचा फेरफटका मारण्याची तसदी आम्हा अज्ञ वाचकांसाठी घ्या व त्यांची (ज्योतिषविशारदाची) प्रतिक्रिया 'चार ओळी'त आम्हाला सांगा. तुम्ही 'तेवढी जागा' त्यांना द्यावा अशी नम्र विनंती.

२१ जानेवारी ८० एस जे. शिर्के, चिपळूण

◘ डॉ. अभ्यंकर यांचा लेख वाचला. लेखाच्या शेवटच्या भागाबाबत थोडसं... हे आवाहन केवळ संघ स्वयंसेवकांना नसून सर्वच युवक वर्गाला आहे असे मी मानतो. त्या संदर्भातच आवश्यक वाटणारे काही मुद्दे.

बंडखोर वृत्ती : पत्राच्या शेवटी लिहि-ल्याप्रमाणे सत्यनारायण करू नये. त्याला विरोध करावा, बुवाबाजी उघड करावी, हुडा न घेता, साधी सोपी लग्नपद्धती स्वीकारावी (हे डॉक्टरांच्या 'त्या' पत्रात नाही, तर हा माझा मुद्दा), बारावा, तेरावा श्राद्ध वगैरे करू नये इ सर्व डॉक्टराच्या अपेक्षा रास्त आहेत; पण त्याची अंमल-बजावणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या बंडखोर वृत्तीचं काय?

बंड हे स्वभावातच असावं लागतं. बंड-खोर युवक तयार करण्याच्या दृष्टीने कोण-तेच प्रयत्न मूल लहान असताना त्याच्या पालकांकडून केले जात नाहीत, उलट मूळ स्वभावात असलेले लहानपणीच मोडून टाकले जाते. मुलगा / मुलगी (लहानपणीच किंवा मोठेपणीही) आमच्या आज्ञेत आहेत याचा पालकांना अभिमान वाटतो. याचीच परिणती शेवटी युवकांना मनात पटत नसलेल्या अनेक गोष्टी कराव्या लागण्यात होते.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य, अर्थहीन रूढी, परंपरा वगैरे तोडण्यासाठी आवश्यक असलेले आर्थिक स्वातंत्र्य आजच्या शहरी युवकांकडे नाही. लग्नाला उभ्या राहिलेल्या शहरी युवकाना जागेसाठी बऱ्याच वेळा वडिलांवर अवलंबून रहावे लागते. चार पाच वर्षांच्या नोकरीत त्याने जमा केलेल्या मिळकतीवर नवीन संसार उभे करण्याचे तर राहोच पण चागल्या वस्तीत एक खोलीही मिळविणे कठीण जाते. अशा वेळी एखाद्या तरुणाला धार्मिक पद्ध-तीने लग्न, त्यातल्या जेवणावळी, लग्नानंतर होणारे सत्यनारायण, वर्षभर होणारे सण वगैरे गोष्टी कितीही नापसंत असल्या तरीही त्यात भाग घ्यावाच लागतो. हुंडा घेणाऱ्या मुलाना शिव्या घालणारे युवक स्वतःच्या लग्नात हुंडा घेतात, नव्हे त्याना तो घ्यावाच लागतो व नंतर पालकांकडे सुपूर्दही करावा लागतो. असाच काहीसा प्रकार वटपूजा, व्रत, नवस याबाबत असतो. सुशिक्षित सुनेला आणि मुलाला ही सर्व व्रते, कुंकू, मंगळसूत्र वगैरे गोष्टी टाकून द्याव्याशा वाटल्या तरीही प्रत्यक्षात कृती करता येत नाही. घरातल्या वातावरणात ते अशक्य असते, कारण लगे-चच घराबाहेर होण्याची नोटीस मिळते. 'हो! आमच्या घरात असली थेरे नकोत!'

तेव्हा प्रत्येक वेळीच तरूण पालकामागे लपतात असे नाही तर त्यांना मनाविरुद्ध अनेक गोष्टी कराव्या लागतात, ते परिस्थि-तीचे बळी असतात. अर्थात प्रत्येकजण असा परिस्थितीचा बळी नसतो. बऱ्याच युवकांना वरील सर्व गोष्टींची हौस असते, त्यावर त्याचा विश्वास असतो. या सर्वांचा निषेध करणे मात्र अत्यावश्यक आहे.

बंडखोर वृत्ती तर आपल्याकडे नसतेच पण दुसऱ्या टोकाचे अतिप्रेमही आपल्या कुटुंबव्यवस्थेत जोपासले जाते. आईवडील, मुलगा-मुलगी, आजी-आजोबा या सर्वांचे असे संबंध असतात की, आपल्या विचारांसाठी हे संबंध तोडण्याची तरुणाची तयारी नसते. 'थोडक्यासाठी कशाला दुखवा' असाच विचार केला जातो. तडजोड केली जाते. अर्थात एकाच बाजूने. मुलाचे नवीन विचार समजावून घेऊन 'त्याना का दुखवा?' हा विचार पालकांकडे असतोच असे नाही. (क्वचित पालकही त्यांच्या आईवडिलामागे लपतात) पुढे पुढे छोट्या गोष्टींनी मोठे रूप धारण केल्यावरही एकाच बाजूने तड-जोड करत रहावे लागते कारण तोपर्यन्त बंड करण्याची वेळ निघून गेलेली असते. आपल्या मुलाचे पाणी बालकांनी जोखल्याने ते पाहिजे तसे त्यांना वाकवितात. स्वतः लग्न ठरविल्यास व पालकाना ते पसंत नसल्यास त्याना 'कन्व्हिन्स' केले जाते. आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असल्यासही पळून जाऊन लग्न केले जात नाही. कारण नाखुषीने का होईना पालकाचे हात डोक्यावर असावेत ही अपेक्षा असते.

वरील सर्व 'रीडींग्ज' माझी स्वतःची आहेत. ती बरोबर असतीलच असे नाही. एकंदरीत जे वाटले ते लिहिले तेव्हा रूढी, परंपरा मोडण्याचा आग्रह पालकानीच धरा-यला हवा. आपल्या श्राद्धावरचा १२००--१५०० रु. खर्च बाबा आमटयांच्या कार्याला जास्त उपयोगी आहे हे त्यानीच लक्षात घ्यायला हवे.

शेवटी, असाही आलेला एक अनुभव. बंगलोर विद्यापीठाच्या कुलगुरूंची सत्यसाई-बाबांच्या विरोधात गेल्याने झालेली हकाल-पट्टी यासंबंधात 'ऑनलुकर'वरून एक लेख मी मराठीत लिहिला. मुबईची दोन प्रमुख दैनिके व पुण्याचे एक साप्ताहिक यानी तो नाकारला. एका दैनिकाने सांगितले आम्ही रूपांतरित लेख छापत नाही. शेवटी तो लेख फाडून टाकला.

२१ जानेवारी ८० मिलिंद कोकजे, मुबई

'माणूस' साप्ताहिकातील डॉ. शरद अभ्यंकर, वाई यांचा लेख वाचला. त्यांनी अंधश्रद्धेवर कोरडे ओढल्याबद्दल धन्यवाद! पण त्यांनी एकांगी विचार केला असावा असे मला वाटते.

तत्त्वज्ञान व अध्यात्म हे मन:शांती मिळवायचे मार्ग आहेत. ह्या विषयावर टीका

पृष्ठ २१ वर

# भूकंप

झंजावाती वादळ येणार !
झंजावाती वादळ येणार ! !
अशी वाऱ्याने बोलवा आणली
आम्हाला वाटले ठीक आहे,
घराची छपरे उडाली
तर नवीन कौले घालू !
झाडे उपटून पडली
तर नवीन झाडे लावू
पण वेधशाळेचे अंदाज चुकले,
आणि
बघता बघता या देशात
भूकंप झाला.
भूकंपाच्या धक्क्याने
गटारातले वर गेले
आणि
वरचे गटारात पडले,
भूकंपात
झाडे, घरे, दारे
जमिनीतच गडप झाली.
लाव्हा रसाचे साम्राज्य
जमिनीवर आले;
हिरवे गवत सुद्धा उरले नाही
पावसाकडे तक्रार करायला;
या देशात
वादळे नेहमीच उठत होती
चक्री वादळाच्या लाटा येत होत्या
घरे–दारे मोडीत होत्या
झाडे उपटीत होत्या
आणि बाप–जाद्यांनी बांधलेले–
रस्ते पूल उध्वस्त करीत होते
पण....
हे सारे पूर्ववत होत होते.
पण आता....
भूकंपाने सारेच नवीन झालंय.
आता
चिंचा, आंब्याची हत्या तर झालीच आहे
पण....
गठेरीशेंडी नावाच्या
हिरवे हिरवे दिसणाऱ्या
पण फळे न देणाऱ्या
नवीन जातीच्या झाडाची लागवड होईल
या देशात
उरलेल्या गलिच्छ वस्तीवर
बुलडोझर फिरतील
आणि रशियन सिमेंटाची
नवीन घरे उभारली जातील
या जमिनीत आता;
मखमली रुझाम्यासारखे
मऊ मऊ गवत उगवेल
त्यांच्यावर पाऊस पाडणारे
ढगही वेगळयाच रंगाचे असतील
या देशात
हृदय नसलेली
यांत्रिक माणसे पैदा होतील
आणि
स्वतःचा लिलाव करणारे
राज्यकर्ते बनतील;
या देशात
जर्सी जातीची
ठराविक विचारसरणीची
इंपोर्टेड माणसे तयार होतील,
त्यांचे पेहरावे
पाश्चात्य रंगाचे असतील,
या देशात
पिकही अमाप येईल
कॉंग्रेस गवताचे
पण चिमण्यांना दाण्यासाठी
तक्रार करावी लागेल
पावसाकडे
चिवचिवणाऱ्या पाखरांना
परागंदा व्हावे लागेल
जिवंत रहाण्यासाठी
या देशात
राजहंसाना वेशांतर करावे लागेल
जगायचेच असेल तर !
मुक्त कंठानी गाणाऱ्या कोकिळांना
आपले स्वर बदलावे लागतील
संगीताच्या बाजारात जाऊन !
घारी गिधाडांची मात्र मजा होईल
या देशात
या देशात –
स्तुती करणाऱ्या भाटांना
मात्र थारा मिळेल
या देशात –
सारेच नवीन होईल
गठेरीशेंडीची झाडे
रशियन सिमेंटाची घरे
मखमली रुझाम्याचे गवत
जर्सी जातीची माणसे
आणि –
वडाच्या झाडाचे
थवेच्या थवे उतरतील
येथील सागराच्या किनारी.

–पाटीलबुवा आंधळे

# केरळ

## इंदिरा लाट रोखता येते

वा. दा. रानडे

लोकसभा निवडणुकीनंतर अठरा दिवसानी झालेल्या केरळ विधानसभा निवडणुकीत डाव्या आघाडीने दोन तृतीयाश जागा जिंकून दहा वर्षांनंतर राज्याची सत्ता पुन: आपल्या हाती आणली. आघाडी व फूट पडली नसती तर सत्ता हातची गेलीही नसती पण जनता पक्ष फुटल्याने ज्यानी इंदिरा गांधींना पुन: सत्तेवर येण्याची सधी मिळाली तशी केरळमध्ये डावी आघाडी फुटल्याने काँग्रेसला कम्युनिस्टाशी युती करून सत्तेत भागीदार होण्याची व आपले बळ वाढविण्याची सधी मिळाली. १९६७ च्या विधान सभा निवडणुकीत काँग्रेसला केरळमध्ये अवघ्या ९ जागा मिळाल्या होत्या. १९७० मध्ये काँग्रेस पक्षात फूट पडली होती, सत्तारूढ काँग्रेसने कम्युनिस्टाशी तर सघटना काँग्रेसने मार्क्सवाद्याशी समझोता केला होता. सत्तारूढ काँग्रेसला त्यावेळी ६२ जागा मिळाल्या तर संघटना काँग्रेसला एकही मिळाली नाही. पक्ष फुटल्यानंतर काँग्रेस अनुयायी मोठ्या संख्येने सत्तारूढ काँग्रेसकडेच गेल्याचे दिसून आले पण काँग्रेसला त्यावेळी २३ जागा अधिक मिळाल्या त्या कम्युनिस्टांशी युती केल्यामुळेच मिळाल्या. मताच्या दृष्टीने पाहिले तर काँग्रेसच्या पाठिंब्यात घटच झाली होती. १९६७ मध्ये काँग्रेसला ३५-४३ टक्के मते होती तर १९७० मध्ये ती १९०७ पर्यंत घटली. १९७७ च्या विधानसभा निवडणुकात काँग्रेसने ३६ म्हणजे १९७० पेक्षा चार जागा अधिक मिळविल्या. पुढे काँग्रेसमध्ये दुसऱ्यादा फूट पडल्यावर त्यातले १७ सभासद इंदिरा काँग्रेसला मिळाले. १९८० ची निवडणूक ही दुसऱ्या फुटीनंतरची पहिली निवडणूक होती पण यावेळचा एक महत्त्वाचा फरक म्हणजे १९६७ प्रमाणे पुन: डावी आघाडी यावेळी स्थापन झाली होती. काँग्रेसच्या दोन पक्षापैकी इंदिरा काँग्रेसचा आघाडीस विरोध होता. तिने आपल्या नेतृत्वाखाली काही छोट्या पक्षाची सयुक्त लोकशाही आघाडी स्थापन केली होती. पण दुसरा काँग्रेस पक्ष डाव्या आघाडीत सामील झाला होता. काँग्रेसला २१ व इंदिरा काँग्रेसला १७ जागा मिळाल्या. विसर्जित विधान सभेत इंदिरा काँग्रेसच्या १७ जागा होत्या तेवढ्याच तिने टिकविल्या. तिच्या बळात वाढ झाली नाही किंवा घटही झाली नाही. काँग्रेसला मात्र २१ म्हणजे विसर्जित विधान सभेतील बळापेक्षा २ जागा जास्त मिळाल्या. डाव्या आघाडीत सामील झाल्यामुळे हे यश मिळू शकले. नाहीतर इतर राज्यातून जसा काँग्रेस पक्ष जवळ जवळ नामशेष झाला तीच गत केरळमध्ये झाली असती. दोन काँग्रेसपक्षाना मिळून ३८ म्हणजे १९७७ मध्ये अविभक्त काँग्रेसला मिळालेल्या जागापेक्षा दोन जागा अधिक मिळाल्या.

डाव्याच्या आघाडीमुळेच इंदिरा लाट केरळमध्ये थोपविली गेली. इंदिरा काँग्रेसने सवंध देशात मिळविलेल्या विजयाचा परिणाम केरळच्या विधानसभा निवडणुकांवर होईल आणि लोकसभा निवडणुकीपेक्षा अधिक यश विधान सभा निवडणुकीत इंदिरा काँग्रेस मिळवील असे अंदाज केले जात होते पण ते खरे ठरले नाहीत उलट डाव्या आघाडीने लोकसभा निवडणुकीपेक्षा अधिक यश विधानसभा निवडणुकीत मिळविले. लोकसभा निवडणुकीने डाव्या आघाडीने २० पैकी १२ म्हणजे ६० टक्के जागा मिळविल्या होत्या. यावेळी १४० पैकी म्हणजे दोन तृतीयांश जागा मिळाल्या. १९६७ एवढे हे यश मोठे नाही. त्यावेळी डाव्या आघाडीत १३३ पैकी ११४ जागा मिळाल्या होत्या. पण तेवढे मोठे यश नसले तरी त्या खालोखाल मोठे यश डाव्यानी मिळविले आहे. पण एकजूट टिकलेली नाही तर मोठे बहुमत मिळवलेल्या आघाडीचे सरकारसुद्धा गडगडू शकते हा अनुभव डाव्या आघाडीला १९६७ नंतर दोन वर्षातच आला. मार्क्सवाद्याना सत्तेवरून दूर करण्यासाठी कम्युनिस्ट व त्यांच्या बाजूचे डावे पक्ष यानी काँग्रेसशी युती केली. जनता पक्षाला फुटीमुळे सत्ता गमवावी लागली. तसेच डाव्या आघाडीच्या बाबतीत दहा वर्षापूर्वी केरळमध्ये घडले होते. आघाडी फुटल्याचा सर्वात जबर हादरा मार्क्सवाद्याना बसला होता. १९७० च्या निवडणुकीत मार्क्सवाद्याच्या आघाडीला अवघ्या ४७ जागा मिळाल्या. त्यात मार्क्सवाद्यांच्या ३४ होत्या. १९६७ च्या निवडणुकीत मार्क्सवाद्यानी ५२ जागा मिळवल्या होत्या म्हणजे आघाडी फुटल्याने त्यानी १८ जागा गमावल्या यावेळी डावी आघाडी पुन: स्थापन होऊन तिने ९३ जागा मिळवल्या असल्या तरी त्यात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला फक्त ३५ जागाच मिळाल्या आहेत. १९७० मध्ये डावी आघाडी दुभगलेली असूनही त्यांनी ३४ जागा मिळवल्या होत्या. यावेळी आघाडी सांधली गेली असतानाही फक्त एक जागा त्याना अधिक मिळाली. केरळचा मार्क्सवादी पक्ष पश्चिम बंगालच्या मार्क्सवादी पक्षाएवढा प्रबळ नाही. आघाडीतील इतर घटक पक्षाच्या पाठिंब्यावर अवलबून न राहता स्वत:च्या बळावर बहुमत मिळविण्याइतके तेथे मार्क्सवाद्याचे बळ वाढलेले आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकात मार्क्सवादी आघाडीने ३९ पैकी ३७ व स्वत: मार्क्सवादी पक्षाने २७ म्हणजे दोन तृतीयांश जागा मिळविल्या. केरळमध्ये एवढे स्थान मार्क्सवाद्यानी मिळविलेले नाही. पण आघाडीत तो सर्वात मोठा पक्ष आहे.

डाव्या आघाडीतील घटक पक्षात काँग्रेसने २१ जागा जिंकून दुसरा क्रमाक मिळविला. तिसरे स्थान कम्युनिस्टानी मिळविले. त्याना १७ जागा मिळाल्या. केरळ काँग्रेस हा बंडखोर काँग्रेसजनाचा पक्ष तीन गटात विभागला होता. त्यापैकी मणि व पिळे गट डाव्या आघाडीत तर जोसेफ गट इंदिरा काँग्रेसच्या आघाडीत होता. मणि गटाला ८, पिळे गटाला १ तर जासेफ गटाला ६ जागा मिळाल्या. मुस्लिम लीगमध्येही दोन तट पडले होते. बडखोर गट (इंडियन युनियन मुस्लीम लीग) इंदिरा काँग्रेसच्या आघाडीत सामील झाला होता. त्याला १४ जागा मिळाल्या तर डाव्या आघाडीत सामील झालेल्या अधिकृत गटाला (ऑल इडिया मुस्लिम लीगला ५ जागा मिळाल्या.) दोन्ही गट मिळून मुस्लीम लीगने केरळमधील आतापर्यंतच्या निवडणुकात सर्वात जास्त १९ जागा मिळवल्या. डाव्या आघाडीत असलेला गट पुरोगामी आणि इंदिरा काँग्रेस आघाडीत असलेला गट प्रतिगामी असे मानण्याचे कारण नाही. दोन्ही गट जातीयवादी आहेत. केरळ काँग्रेसमधील गटही निश्चित भूमिकेला किंवा कार्यक्रमाला बाधलेले नाहीत.

इंदिरा काँग्रेसच्या आघाडीने ४६ जागा मिळविल्या – डाव्या आघाडीत फाटाफूट घडवून आणून पुन. सत्तेवर येण्याचा प्रयत्न इंदिरा काँग्रेस करण्याचा सभव आहे. निर्णायक बहुमतासाठी त्यांना आणखी २५ सभासदाचा पाठिंबा हवा आहे. काँग्रेस, केरळ काँग्रेस, बडखोर मुस्लीम लीग याचे सभासद फोडून हे साधण्याच्या हालचाली होण्याची शक्यता आहे. डाव्या आघाडीशी सहकार्य करण्यानेच इंदिरा काँग्रेसला प्रभावी पर्यायी शक्ती देशात निर्माण होऊ शकते हे पश्चिम बगाल व केरळने दाखवून दिले आहे. जनता, लोकदल, काँग्रेस आणि डावे गट यानी एकत्र येऊन सयुक्त आघाडी उभारल्यास देशात अशी पर्यायी शक्ती उभी करता येईल. त्यासाठी एकमेकाबद्दलचे हेवेदावे, स्वत:च्या सामर्थ्याबद्दलचे अवास्तव भाडण सोडून मतभेदापेक्षा मतक्यावर भर देऊन व्यापक भूमिकेवर एकत्र येण्याची आवश्यकता आहे. ☐

मुंबई वार्ता । विनय सहस्रबुद्धे

# महाराष्ट्र जनता पक्ष : पुनर्बांधणीपूर्वी....

गेल्या १६ तारखेला महाराष्ट्र प्रदेश जनता पक्षाच्या प्रमुख कार्यकारिणीची बैठक व त्याला जोडूनच पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा एक मेळावाही आयोजिण्यात आला होता. देशातील ज्या दोन राज्यात जनता पक्षाला लोकसभेच्या सर्वाधिक जागा मिळाल्या (आठ), त्यापैकी महाराष्ट्र हे एक राज्य आहे, हे खरे असले, तरी त्यात महाराष्ट्र जनता पक्षाला 'कॉलर ताठ' करण्यासारखे काही नाही. कारण मिळालेल्या आठ जागा अनपेक्षितपणे व भव्याने मिळालेल्या नाहीत. इंदिरा लाटेत अन्य उमेदवार वाहून गेले. हे सुदैवी आठ जण टिकले, एवढेच फार तर म्हणता येईल. तात्पर्य, इतर अनेक राज्याप्रमाणे सत्तेची सूत्रे हाती असतानाही राज्य जनता पक्ष या निवडणुकीत पार धुऊन निघाला, ही वस्तुस्थिती आहे. दोन कॉंग्रेस जनाच्या लढतीत जनता पक्ष वरचढ ठरेल इ. आशावादाच्या बळावर ज्या जागा जनाताला मिळतील असे वाटत होते, त्या तर मिळाल्या नाहीतच परंतु विसर्जित लोकसभेतील आठ जनता पक्ष सदस्यांचाही या निवडणुकीत टिकाव लावला नाही. हे सारे कसे घडले, का घडले? अपयशाचे खापर अन्य कोणावर फोडायचे की पराभवापासून काही शिकण्याची तयारी ठेवायची? सरकारची चांगली कामे मतदारापर्यंत पोचली की नाही? इ. नानाविध प्रश्नांचा वस्तुनिष्ठ विचार प्रदेश जनता पक्षातील मंडळी करणार आहेत, की 'लाट म्हटली की असं होणारच' अस म्हणून पक्षाच्या पुनर्बांधणीकडे दुर्लक्ष करणार आहेत, इ. साऱ्या प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर निवडणूक निकालानंतर लगेचच भरणाऱ्या या मेळाव्याला एक आगळे महत्त्व होते यात शंका नाही.

१६ तारखेला सकाळी कार्यकारिणीच्या बैठकीत प्रारंभी प्रदेश जनताध्यक्ष बबनराव ढाकणे यांचं भाषण झाल. 'आपल्या पक्षाचा पराभव अनपेक्षित व धक्कादायक असला तरी गडबडून जाता कामा नये. विविध ठिकाणी पक्षाच्या पराभवाला वेगवेगळी कारणे आहेत. त्या साऱ्यांचा विचार करून आपल्या भावी कामाची दिशा ठरविली पाहिजे,' अशा आशयाचं भाषण ढाकणे यानी केलं.

. राज्य जनता पक्षाचे उपाध्यक्ष, नासिकचे श्री. मूळचंद गोठी यांचंही या बैठकीत प्रारंभीचं भाषण झालं. गोठी यांनी पुरोगामी लोकशाही दलाचं सरकार व जनता पक्षाचा त्यातील सहभाग इ. बाबत विस्तारानं चर्चा केली. पु. लो द. मधील अन्य मंत्र्यांची कामगिरी याचा आढावा घेऊन ते म्हणाले की, मंत्रिमंडळातील आमचे मंत्री कधीच स्वतःला assert करीत नाहीत. गोठी यानी उपस्थित केलेल्या या मुद्याची बैठकीनंतर माझ्याशी विस्ताराने चर्चा करताना, पक्षाच्या एका सरचिटणीसांनी सांगितले, की गोठी याची तक्रार बऱ्याच प्रमाणात खरी आहे. पु लो. द. मन्त्रिमंडळातील आमचे मंत्री स्वतःला assert करू शकत नाहीत, याचं कारण काही अपवाद वगळता जनता पक्षाच्या मंत्र्यांपैकी कोणीही स्वभावतः राजकीय किंवा 'राजकारणपटू' नाही यापैकी कोणी अकार्यक्षम आहे असं जरी नसलं तरी कुणालाही सत्तेच्या व्यापाची व तो सांभाळताना कराव्या लागणाऱ्या कसरतीची सवय नाही. ही एक त्रुटी आहे हे मान्य करून ह्या सरचिटणीसानी सांगितलं की, ही त्रुटी राहण्यालाही तशीच काही कारणे आहेत. उत्तमराव पाटील विधिमंडळ जनता पक्षाचे नेते आहेत पण ते ज्या जनसंघातून आले त्या पक्षात ते नेते म्हणून, ज्याच्याकडे नेतृत्व करण्याचीच जबाबदारी आहे असे 'नेते' म्हणून पुढे आले आहेत. जनसंघात काय किंवा समाजवाद्यांमध्ये काय, संघटनात्मक बाजू साभाळणारे वेगळे आणि नेतृत्व करणारे वेगळे होते. त्यामुळे यापैकी कुणालाही, विशेषतः नेतृत्व करणाऱ्यांना, पक्षबांधणीतील उर्वरित कामाचा अनुभव मिळाला नाही. एका विशिष्ट संदर्भात पक्षाचे नेते आणि जनतेचे नेते हे वेगवेगळे राहिले. उत्तमरावांनी अनेक वर्षे राजकारणात काढली आहेत, त्यामुळे त्याना निदान जिल्ह्या-जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची माहिती तरी आहे. निहाल अहमद किंवा प्रमिला टोपले याच्याबाबत तसे म्हणता येणार नाही. त्यामुळे या मंत्र्याना कित्येक कार्यकर्त्यांची माहितीसुद्धा नाही, नव्हती. असे अनेकजण दूरदूरच्या गावातून आपापली कामे व्हावीत यासाठी सचिवालयात येत पण त्यांना योग्य तो प्रतिसाद मिळत नसे. 'कॉंग्रेसच्या मत्र्यांकडून आमची कामे होत असत, पण जनता मंत्र्याकडून होत नाहीत' ही तक्रार याच्यातूनच उद्‌भवली. अनेकजण आडमार्गाने काही कामे करावीत असा आग्रह धरतात. बदल्या, नेमणुका, बढत्या इ. बाबत अनेक कार्यकर्त्यांचे अनाठायी आग्रह असतात. असं out of the way जाऊन काम करण्याची आमच्या मंत्र्याना सवय नाही आणि त्याबद्दल आम्हाला खेदही नाही. पण हे काम होणार नाही, कृपया निघून जा, ही काही कार्यकर्त्यांना सांगण्याची पद्धत नाही. वस्तुतः मंत्र्याची भाषा सूचक असते, असली पाहिजे अमुक एका कामाबद्दल संबधित मंत्र्याने 'बघतो' असे म्हटले तर काम होण्याची आशा असते. 'पाहू या' असे म्हटले तर फारशी आशा नसते. पण 'काम होणार नाही' असेच जर कुणी म्हटले तर ती व्यक्तीच मंत्री होण्यास पात्र नसते हे तारतम्य, ही कार्यकर्त्यांची कामे हाताळण्याची पद्धत, सत्तेचा प्रथमच अनुभव घेणाऱ्या आमच्या मंत्र्यांकडे नव्हती व त्यामुळे अनेक कार्यकर्ते नाराज झाले. हीच गोष्ट assert करण्याबद्दलही सागता येईल, मन्त्रिमंडळाच्या बैठकीत आग्रही, प्रसंगी टोकाची भूमिका घेऊन आपले म्हणणे गळी उतरविणे जनता नेतृत्वाला जमले नाही. एन. डी. पाटलासारखा नेतृत्वकुशल संघटक जी आग्रही भूमिका घेऊ शकत असे ती घेण्यात जनता नेतृत्व अपयशी ठरले.

'याचा अर्थ संघटनात्मक आणि नेतृत्व विषयक जबाबदारी एकाच व्यक्तीकडे न देण्याची जनसंघादी पक्षाची पद्धत कुचकामी ठरली असे म्हणायचे का?' या माझ्या प्रश्नाला नकारार्थी उत्तर देऊन या सरचिटणीसानी सागितले की, महाराष्ट्रात ही पद्धत काहीशी कुचकामी ठरली असली तरी सर्वत्रच अशी परिस्थिती नाही. तसे असते तर राजस्तानात भैरोसिंग शेखावत आणि मध्यप्रदेशात सकलेचा 'सघटनकुशल नेते' बनले नसते. तात्पर्य, महाराष्ट्राच्या बाबतीत प्रचलित पद्धत सदोष असल्याचे वाटत असले

तरी त्यामुळे एकूण व्यवस्थेतच काही तरी चूक आहे असे म्हणण्याची गरज नाही.

बबनराव ढाकणे आणि मूळचंद गोठी यांच्यानंतर माजी खासदार डॉ. बापूसाहेब काळदाते यांचंही या बैठकीत भाषण झालं. अपयशानं खचून न जाता जनता पक्षाचा प्रयोग यापुढेही नव्या जोमाने आणि जिद्दीने चालू ठेवला पाहिजे अशी भूमिका त्यांनी आग्रहाने मांडली. लोकसभा निवडणुकीत झालेल्या सर्वसाधारण मतदानाची चिकित्सा करताना ते म्हणाले की, एखाद्या व्यक्तीच्या प्रभावामुळे का होईना, पण मतदार जातीधर्म भेदा बाहेर विचार करून मतदान करीत आहे. या निवडणुकीत अनेक मतदार संघात ही बाब सिद्ध झाली आहे व त्या प्रवृत्तीचे आपण स्वागत केले पाहिजे. पक्षाच्या पराभवाची मीमांसा करताना ते म्हणाले, की आपल्या पक्षाची जनमानसातील प्रतिमा ही प्रामुख्याने मध्यमवर्गीय हिंदूंचा पक्ष अशीच आहे, त्यामुळे कामगारासह अनेक गोरगरिबांची मते आपल्याला मिळाली नाहीत. जनता पक्षाच्या राजवटीत लोकाना दैनंदिन जीवनात स्पष्टपणे जाणवेल असा बदल झाला नाही हे ही एक महत्त्वाचे कारण आहे असे डॉ. काळदाते यानी सांगितले.

राज्यातील पु लो. द. सरकारने अनेक चांगली कामे केली, पण त्याचा मतदारांवर परिणाम दिसून आला नाही ह्या मुद्द्यावर बोलताना सांगली जिल्हा जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते अण्णासाहेब डांगे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आम्ही केलेल्या सुधारणा म्हणजे जत्रेत उधळलेलं खोबरं होतं. माणसाच्या भाऊगर्दीत उधळलेल्या खोबऱ्याला प्रसादाचे महत्त्व असते व मोठ्या भक्तिभावाने लोक हा प्रसाद खातात. पण जत्रेत खोबरं उधळणं वेगळं आणि खोबऱ्याचा छोटासाच तुकडा आपुलकीनं एखाद्याच्या हातात देणं वेगळं. पु. लो. द. सरकारच्या सुधारणा या जत्रेत उधळलेल्या खोबऱ्यासारख्या होत्या. त्या जनतेपर्यंत पोचल्या, पण मतदारांना जाणवल्या नाहीत. सरकारी योजनांची फलिते कार्यकर्त्यांच्या साखळीच्या आधाराने खेड्यातल्या गोरगरीब जनतेपर्यंत गेली असती तर एवढा दारूण पराभव झाला नसता.

जनता किंवा पु. लो. द. सरकारने केलेल्या सुधारणा वा आखलेल्या नवीन योजना यांचा नीट पाठपुरावा कसा झाला नाही याचं एक उदाहरण देताना जनता पक्षाच्याच एका कार्यकर्त्यानं सांगितलं की, आदिवासी अतिक्रामकाना जमिनीचे पट्टे नियमित करून देण्यात आले, या योजनेचा खूप गाजावाजाही झाला. पण एका जिल्ह्यात तर प्रत्यक्ष उद्घाटनाच्या वेळी ३, ४ आदिवासीना पट्ट्याची जी एकदा मालकीपत्रे मिळाली, त्यानंतर एकालाही अद्यापपर्यंत ही मालकीपत्रे मिळाली नाहीत. पाठपुरावा किंवा नीट अंमलबजावणीच्या अभावी चांगल्या योजना अर्धवट राहिल्या असेही या कार्यकर्त्याने सांगितले.

याच बैठकीत बोलताना श्री. वीरेन शहा यांनी या निवडणुकीत आपल्याला अनेक ठिकाणी हमखास मिळतील असे वाटणारी मतेही का मिळाली नाहीत याचा गांभिर्याने विचार करण्याचे आवाहन केले. 'या निवडणुकीतील पराभवाचा हा दणका एवढा मोठा आहे की, उगाचच एखाददुसऱ्या घटक पक्षावर पक्षाच्या अपयशाचे खापर फोडण्यात अर्थ नाही' असेही ते म्हणाले.

मुंबई जनता पक्षातील एक प्रमुख नेते श्री. नारायण तावडे यांनी आपल्या भाषणात मधू लिमयांवर टीका करून असा सवाल केला की, जनता पक्षात विलीन होण्यापूर्वी विविध घटक पक्षाची जातकुळी काय आहे हे काय आम्हाला ठाऊक नव्हते? तेव्हा आता अमुक एका घटकाला एकाकी पाडण्याचे प्रयत्न योग्य नाहीत, असेही श्री. तावडे यांनी सांगितले

याच बैठकीत श्री. ग. भा. कानिटकर, श्रीमती जयवंतीबेन मेहता व माजी खासदार लक्ष्मणराव मानकर यांचीही भाषणे झाली.

## आत्मपरीक्षण

या बैठकीबाबत माहिती दिल्यानंतर पक्षाच्या संघटनेतील एका ज्येष्ठ नेत्याने सांगितले की, महाराष्ट्रात जनता पक्षाच्या पराभवाला काही विशिष्ट परिस्थिती कारणीभूत झाली आहे हरिजन पंतप्रधान होणार ही जमेची बाजू असूनही हरिजन, नवबौद्ध किंवा मुस्लिमांची मते अतिशय नगण्य प्रमाणात जनता पक्षाला मिळाली. बाबूजी हे हरिजनाचे नेते असले तरी इंदिरा गांधीनी आपणच काय त्या हरिजनांच्या तारणहार आहोत अशी जी स्वतःची पद्धतशीर प्रतिमा निर्माण केली ती जनता पक्षाला पुसता आली नाही. शिवाय बेलची, जमशेदपूर, अलिगढ इ. ठिकाणच्या हिंसक घटनाबद्दल मधू लिमये प्रभृती जनता पक्षियांनीच गदारोळ उठविल्यामुळे, तसेच धर्मस्वातंत्र्य विधेयकामुळेही जनता पक्षाची खूप हानी झाली. नवबौद्धांच्या सवलतीची मागणी इंदिरा गांधी काय किंवा मोरारजी देसाई काय, कुणीच मान्य केलेली नाही. पण इंदिरा गांधी 'बघू या, आम्ही प्रयत्नशील आहोत' इ. सांगतील तर मोरारजीनी 'सवलती मिळणार नाहीत' असे चक्क ठणकावून सांगितल्याने नवबौद्धही दुखावले गेले व त्यांची मतेही मिळाली नाहीत. याशिवाय महागाईमुळेही लोक, जनता पक्षच या महागाईस जबाबदार आहेत अशाच समजूतीत राहिल्याने, जनतावर नाराज झाले.

समांतर काँग्रेसशी जनता पक्षाचा बेबनाव झाला व त्यामुळे मते विभागली गेली हे खरे असले तरी असे मतदारसंघ कमी आहेत. उदा कुलाबा, द मध्य मुंबई व डहाणू मतदारसंघात समांतर काँग्रेस समर्थित उमेदवाराला जनताने पाठिंबा दिला असता तर काँग्रेस (आय) उमेदवाराचा पराभव होण्याची बरीच शक्यता होती. पण याचबरोबर आणखीही एक मुद्दा लक्षात घ्यायला हवा तो हा की, ज्या जागांवर समांतर काँग्रेसने आपला हक्क सांगून जनता पक्षाशी 'मैत्रीपूर्ण लढत' दिली त्यातील बहुसंख्य ठिकाणी जनता पक्षाने समांतरच्या उमेदवारावर मात केली आहे. मुंबई उपनगर-पूर्व, बारामती, सोलापूर, एरंडोल, जळगाव, जालना, चिमूर, रामटेक व ठाणे या नऊ जागांवर जनता उमेदवारांनी समांतरला तिसऱ्या क्रमांकावर ढकलून इंदिरा काँग्रेसशी चांगली लढत दिली. दोन (ठाणे व मुंबई उपनगर पूर्व) जागा तर जनताने जिंकल्या देखील.

'ही सारी कारणे तुम्ही नीट समजून घेतली आहेत, मग आता पुढची कारवाई काय?' या प्रश्नाचे उत्तर देताना या ज्येष्ठ नेत्याने सांगितले की, पु. लो. द. मधील जनताचा सहभाग चालू ठेवावा असाच सर्वसाधारण सूर आहे. परवाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत वा नंतरच्या पक्ष मेळाव्यातही एकानेही पु. लो. द. मधून जनताने बाहेर पडावे अशी मागणी केली नाही.

संघटनात्मक पातळीवर दलित आणि मुसलमानांच्या वस्त्यांमधून पक्ष कार्यकर्त्यांचा संपर्क वाढविणे व या भागात व्यापक प्रमाणावर नव्या योजना राबविणे या दृष्टीने प्रयत्न करण्यावाचून गत्यंतर नाही कारण अखेर भारतीय मतदार विविध जमातींच्या Vote-Banks मध्ये विभागला गेला आहे. तेव्हा या जातीजमातींच्या वस्त्यांमधून काम करणे हेच जनता पक्ष पराभवाच्या गणिताचे नेमके उत्तर आहे. पक्षाच्या पुनर्बांधणीचा विचार करताना याचा विसर पडणे परवडणारे नाही. □

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

# भारताचा ढगांचा कारखाना

मंडाले म्हटलं की आपल्या डोळयापुढे तुरुंगातली एक खोली येते. त्यात बसलेले टिळक येतात. तेथे येणारी ती प्रसिद्ध चिमणी येते आणि टिळक सारखे गीतारहस्य लिहीत आहेत असे दिसते. मंडाले एक शहर आहे. तिथे इतर माणसे जीवन जगतात. ते ब्रह्मदेशात आहे वगैरे गोष्टी कधी डोक्यात येत नाहीत. टिळकांना गीता लिहिण्यासाठी ते उत्पन्न झाले व गीतारहस्य लिहून झाल्यावर पृथ्वीतलावरून गेले असेच वाटते.

हीच भावना मला अंदमानची येते. अंदमान म्हणजे जन्मठेप. अंदमान म्हणजे चक्की पिसणं. अंदमान म्हणजे जळवा. अंदमान म्हणजे क्रांतिकारकांचं स्मशान. अंदमान म्हणजे पाठीची साल लोंबेपर्यंत फटके. अंदमान म्हणजे सावरकर. अंदमान म्हणजे ज्वलंत देशभक्ती. अंदमान ही बेटे आहेत. तिथे नारळी आहेत, हवापाणी आहे आणि अंदमानी लोकांचे संसार आहेत हे लक्षातच येत नाही.

सुदैव म्हणजे ज्या नव्या पिढीला टिळक, सावरकर खूप मागचे आहेत व त्यांचा प्रभावही ज्यांच्यावर नाही ती तरुण पिढी मंडालेला मंडाले समजते व अंदमानला अंदमान समजते हे चांगले आहे. तरुण पिढीतले विंग कमांडर प्रताप मराठे यांना तर अंदमान म्हणजे भारताचा ढगांचा कारखाना वाटतो. ते म्हणाले, 'मी नेहमी गमतीने म्हणतो की भारताला पावसाळयासाठी लागणाऱ्या ढगांचे उत्पादन अंदमानला होते.'

अंदमानची काय पण कुठल्याही भूप्रदेशाची मी अशी व्याख्या ऐकली नव्हती. टिळकरोडवरील टिळक स्मारक मंदिरातील तळघरातील छोटया सभागृहात, प्रताप मराठे यांनी उघडलेले आपल्याजवळच्या शंख-शिंपल्यांचे प्रदर्शन मी पाहून आलो व नंतर लगेच त्यांच्याशी बोललो. प्रताप मराठे हे आपल्या सुप्रसिद्ध कवियत्री संजीवनी मराठे यांचे चिरंजीव आहेत. बोलता-बोलता ही गोष्ट कळल्यावर त्यांनी गोळा केलेल्या शंखशिंपले प्रवाळ यांच्या सुंदर प्रदर्शनांचा उलगडा झाला.

सभागृहात चारी बाजूने टेबल लावून त्यावर चादरी घालून, चादरीवर शंखशिंपले ठेवले होते. प्रत्येक तऱ्हेवर नावाचे कार्ड होते व टेबलामागे उभी राहिलेली मुलं शंखशिंपले समजावून सांगत होती. प्रदर्शनास लोकांनी चांगलीच गर्दी केली होती.

प्रदर्शनासाठी छापलेल्या हस्तपत्रिकेत म्हटले होते, ' येथे मांडलेले सर्व शंख, शिंपले, प्रवाळ, स्पंज हे एकेकाळी जीवंत होते. प्रत्येक शिंपल्यात, कवडीत एक प्राणी होता. हे सर्व प्रकार ' Molluses ' या गोगलगाईच्या वर्गात मोडतात. समुद्र-स्पंजाच्या एका सेंटीमीटर तुकडयात लाखो प्राणी असतात. हे सर्व शंखशिंपले, प्रवाळ, स्पंज विंग कमांडर प्रताप मराठे यांनी मोठया परिश्रमाने अंदमान निकोबार बेटावरून जमा केले आहेत. यांना प्रदर्शनीय स्वरूप त्यांचे पुतणे श्री. संतोष व उज्वल मराठे यांनी दिले आहे.'

◻

प्रदर्शनात शंख, गोगलगाईचा शिंपला, कवडया, कोन, शिंपले, प्रवाळ, समुद्रातील वनस्पती यांचे इतके विविध प्रकार होते की, समुद्रातील जीवन पृथ्वीवरील जीवनापेक्षा विविध आहे म्हणतात ही गोष्ट पटत होती. आणि समुद्रातील जीवसृष्टीचे आकर्षण का वाटते हे कळत होते. शंख शिंपले, कवडया यांचे आकार आपल्यापुढे ठरलेले ठराविक असे आहेत. जसे नारळ, पेरू यांचे आकार साधारण ठरलेले असतात. पण जर हंडयाएवढा नारळ व घागरीएवढा पेरू कोणी दाखवला तर जे वाटेल, बरोबर तीच भावना येथे ठेवलेले शंख, शिंपले, कवडया बघून येत होती. बरोबर सांगायचे तर हे सर्व शंख, शिंपले भीमाचे होते. आपणासारख्या साध्या माणसाचे नव्हते. भीमाने या कवडयांनी घटोत्कचाबरोबर खेळावे. असे वाटत होते की जर याहून प्रचंड शंख, शिंपले समुद्राच्या पोटात असले तर ते वर आणून माणसाचा घराचा प्रश्न सुटेल.

श्री. मराठे यांच्या माहितीप्रमाणे हे सव प्राणीच आहेत. शंख हा सर्वांत मंदगतीचा प्राणी आहे. त्याचे वास्तव्य प्रवाळांच्या कॉलनीजवळ असते. शंखांच्या बोटांचा उपयोग प्रवाळावर घट्ट पकडून बसण्यासाठी त्या प्राण्याला होतो. उजव्या हाताचे शंख होते. काही शंखावरील रंगाकृत्या कुणाही महिलेला आपल्या पातळावर असाव्या असे वाटण्याइतक्या मोहक होत्या. कवडयांवरचे रंग तर आणखीनच विविध व वेधक होते. काही कवडया इतक्या लहान होत्या की त्या पहाण्यास भिंग ठेवले होते.

◻

प्रताप मराठे संजीवनी मराठे यांचे पुत्र असल्याचे आधी माहित नसल्याने कोण कुठले वगैरे प्रश्न विचारले, त्यांचा जन्म पुण्याचा असून ते दोन वर्षे मुंबईत व आठ वर्षे बेळगाव, सांगली इकडे होते. त्यांचे निकोबार

येथे असल्याचे कारण ते विमानदलात विंग-कमांडर आहेत व त्यांची बदली निकोबारला-कार-निकोबारला-झाली होती. ते म्हणाले, 'ही सारी प्रवाळ बेटे आहेत. त्यातून निकोबारमध्येच काय ती थोडी बातमी आहे, इथले बेटावरचे जीवन एक्कलकोडे आहे, पोर्टब्लेअर बंदरातून एक बोट निघत असते, ती महिन्यातून दोन वेळा सबंध बेटांचा फेरा करते. बाहेरच्या जगाशी हाच काय तो प्रत्यक्ष संबंध असतो, मी राहातो ते कारनिकोबार बेट, सात चौरस मैलाचे आहे. त्यावरील चौपाटचा (बिचेस) प्रवाळात भरलेल्या तर काही वाळूच्या आहेत. भरती आली की, प्रवाळाच्या चौपाटचा भरतात. ओहोटी आली की, रिकाम्या पडतात. भरतीबरोबर शंख शिंपले येतात. पण आश्चर्य हे की, प्रवाळाची जमीन खडबडीत असूनही त्यात एकही शंख शिंपला अडकून बसत नाही. उलट वाळूच्या चौपाटीत, आहोटी झाल्यावर शंखशिंपले वाळूत रुतून ससलेले असतात.

अंदमानात चोवीस अंदमानी आहेत व निकोबारमध्ये आगेशेपेन. निकोबारी लोकाची पन्नास कुटुंबे आहेत. मराठे रहात होते त्या कारनिकोबार बेटाच्या कडेकडेने प्रदक्षिणा घातली तर अठ्ठेचाळीस किलोमीटरचा घेर होतो. जमीन रेताड असून नारळी चिक्कार आहेत. नारळीच्या व्यतिरिक्त येथे केवडा, पोपया, बावू, वेत, केळी व सुपारी होते. कॉफी व कोकोही होऊ शकतो.

मराठे पुढे म्हणाले की, तेथे मधमाशा नाहीत व लाडगे कोल्हे वगैरे जनावरे नाहीत. तेथील अन्न म्हणजे मासे, डुकरे, नारळ, केवडीची फळे, रताळी, अळूकादे, नीरफणस हे आहे. तेथे कबुतरे, अजगर, साप आहेत. तेथे दोन पावसाळे येतात.

त्यानी केलेले कारनिकोबारचे वर्णन रॉबिनसन क्रूसोसारखे वाटले. शंख शिंपले गोळा करण्याचा नाद आपल्याला कसा लागला हे सागताना मराठे म्हणाले,

'तेथे कामाची वेळ सकाळी ७॥ ते १॥ वाजेपर्यंत असते. तेथे काही करमणक नसल्यानं दीडनंतर काय करावयाचं हा मोठा प्रश्न असे. जाऊन बीचेसवर—चौपाटी-वर—हिंडावयाचं एवढीच एक करमणूक. तेथे चौपाटीवर वाळूत रुतलेले शंख शिपले मी बाहेर काढून पाहिले होते. मग ठरवलं की शंख शिंपले गोळा करू असे आकार मी कधी पाहिले नव्हते. मग संध्याकाळ होई-पर्यंत शखशिंपले गोळा करणे सुरू केले जसे मिळतील तसे गोळा करून घरी आणावयाचे मग रात्री बसून त्याची वर्गवारी लावाव-याची. अर्थात मी त्यात नवखा होतो. हे शास्त्र जाणणारानी त्याना दिलेली नावे किंवा त्यांची आणखी काही माहिती मला नव्हती. मग मी भारतात सुट्टीत आल्यावर येथील पुस्तकाच्या दुकानातून शंखशिंप-ल्याची माहिती देणारे पुस्तक घेतले. त्या पुस्तकाच्या तीन प्रती घेतल्या व परत निकोबारला गल्यावर तिथल्या शाळेला एक दिली व एक इतरत्र दिली. आता शंख-शिंपल्याचा संग्रहही वाढला होता. वर्गवारी व्यवस्थित चालू होती. गावकरी तो संग्रह पाहून म्हणत—'तुम्ही आम्हाला लाज आणली. आम्ही इथले असून आम्ही हे कधीच करा-यला हवे होते. पण केले नाही.'

□

गावकऱ्यानी मराठ्याचे जे कौतुक केले त्याबद्दल मला विशेष वाटले. आपण जिथे जाऊ तेथे आपली ज्ञानासक्ती व कुतूहल जागृत ठेवावयाचे व आपला फावला वेळ छंदामध्ये घालवावयाचा ही एक नवी प्रवृत्ती येत असली तर ती स्वागतार्ह आहे.

मराठे पुढे म्हणाले, 'जसजसे जमतील तसतसे जमलेले शंखशिंपले मी घरी पाठवीत राहिलो. काही वर्षांनी चिक्कार शंखशिंपले जमल्याचे कळले. मग एक या विषयावरचे मोठे पुस्तक आणून त्यावरून पाहून आम्ही आमच्या सग्रहाच्या याद्या केल्या. प्रदर्शनास योग्य अशी त्याची माडणी केली व पहिल्यादा हा संग्रह आमच्या कॉलनीत दाखवला. तो अतिशय आवडला.'

शंखशिंपले हुडकून काढण्याचे काम कसे केले हे सागताना ते म्हणाले,

'शखशिंपल्याची गमत असते. आपण अगदी डोळे ताणून वाळूवरून बघत बघत जावं. शंख ओलाडून जातो पण कळत नाही. पण मागे मान करून आलेली वाट बघावी. हुकलेला शंख शिपला एकदम दिसतो. एकदा समुद्र भयंकर खवळला होता. अशा वेळेला लाटेबरोबर मोठमोठाले शख, शिंपले, कोन किनाऱ्यावर येऊन पडतात. तसा एक भला मोठा जॉइंट क्लॅम (मिटता उघडता शिंपला) किनाऱ्यावर येऊन पडला. तो चार फूट लाब, दीडदोन हात रुंद होता. तो उचलून नेण्यासाठी दोर वगैरे आणण्यास गेलो. काही वेळाने परत आलो तर ओहो-टीच्या लाटांनी तो परत समुद्रात नेला होता. कदाचित त्या तऱ्हात तो सर्वांत मोठा शिंपला ठरला असता तो उचलायला सहा जण लागले असते इतका तो मोठा होता. तो गमावल्याची मला हळहळ लागली.'

मराठे यांची ही मुलाखत तुम्ही वाचीत आहात. मुलाखत घेताना त्यांचे शब्द ऐकत असता मी जसे क्रांतिकारकांचे अंदमान विसरलो तसे तुम्हीही ते विसरले असाल. नारळांनी भरलेली, शंखशिंपल्यानी विखुर-लेली, जिथे दोन वर्षाऋतू गर्जतात, जिथे उभे राहिले की, सर्वत्र आकाशाचा निळा घुमट व समुद्राच्या लाटा दिसतात असे अंदमान तुमच्या मनात ठसेल. सारख्या दुःख, चीड, संताप यांच्या गोष्टी आठवण्यात जी विकृती आहे तीच मंडाले व अंदमान यांच्या बाबतीत आपली झाली आहे. निदान माझी तरी ती विकृती मराठे यांच्याशी बोलण्याने दूर झाली. मंडालेचे नाव निघाल्यावर कुणी म्हटलं की, 'लो. टिळक तुरुंगात होते तेच ना? किंवा अंदमान म्हटले की विचारले, 'सावरकर जन्मठेपीत होते तेच ना?' मी सांगेन, 'नाही. मंडालेला सुदर बुद्धमंदिर आहे व अंदमान हे नैसर्गिक उद्यान आहे.'

आमची मुलाखत संपता संपता मराठे यांनी मला कोडे घातले. ते म्हणाले,

'सगळीकडून भरती का येते? जमि-नीच्या एकाच बाजूनं ती आली पाहिजे. माझ्या प्रश्नाचे उत्तर अंदमान निकोबारला आल्यावर मिळाले.'

ते काय ते आम्हाला वाचकानीच कळवावे.

□

# बगाड ( ६ )

# साप्ताहिक प्रिमा

बध्या

हल्ली चाफाजीरावांविषयी ऐकले नाही बरेच दिवसात.

अण्णासाहेब, गाडी उताराला लागली तुमची. *त्यातून अलीकडे प्रतिगामी विचारांच्या* पक्षात तुम्ही अडकलात. त्यामुळे धावत्या दुनियेच्या हजारो मैल मागे तुम्ही पडला आहात. नाहीतर चाफाजीरावाविषयी तुम्ही असं बोलला नसतात. जरा तुमची *पोरंबाळं काय वाचतात याच्याकडे* लक्ष द्याल तर चाफाजीरावाचं काय चाललं आहे हे ध्यानात येईल तुमच्या.

बध्याजी, जरा सरळ बोला बुवा. अहो तुमच्या चाफाजीरावाचा आणि आमची मुलं *काय वाचतात याचा काय संबंध ?*

पण सांगा तर खरं, तुमचा नंद्या आणि मोहिनी काय वाचतात ते.

आमचा नंद्या नुकता कोठे नोकरीला लागला. मधून मधून इंग्रजी पुस्तकं विकत घेतो. *मध्ये त्याने* आणलेले 'फ्लेश' नावाचे पुस्तक चाळले. तुम्हाला सांगतो, अक्षरशः ओकारी आली दहा-पंधरा पानं वाचताच. तेव्हा ठरवलं, ही कारटी काय वाचतात ते पाहयचं नाही म्हणून.

अं हं. पुस्तकाविषयी नाही बोलत मी. काही साप्ताहिकं, मासिकं आणत असेलच की नाही.

हा. हल्ली तो 'प्रिमा' नावाचं साप्ताहिक आणत असतो जाहिरातही असते त्याची सगळ्या वर्तमानपत्रातून. आमची बायको पण वाचते वेळ घालवायला.

तुम्ही बघितलं की नाही ते वाचून.

नाही बुवा. 'फ्लेश' चाळल्यापासून नंदू काय वाचत असेल त्याचा मी धसकाच घेतलाय.

अहो, 'प्रिमा'ची कीर्ती महाराष्ट्राच्या चारी प्रदेशात दुमदुमून राहयली आहे. ती पहा. मुंबईच्या लोकलमध्ये गर्दीत दुमडून उभी असलेली माणसं बसणाऱ्या धक्क्याना न जुमानता इचभर रुंदीची घडी केलेल्या 'प्रिमा'वर नजर चिकटवून आहेत. त्या पहा. नगर, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यातून पसरलेल्या साखर कारखान्याच्या वस्त्यातल्या आनंदीबाई, वत्सलाताई आणि सरलाक्का. पोरं शाळेला आणि नवरे कारखान्यात केव्हा जातात आणि आपण पदराने वारा घेत 'प्रिमा'तले स्पेशल रिपोर्टस् केव्हा वाचतो याची उत्सुकतेने वाट पाहत आहेत. चला, अमरावती, वणी, उद्गीर आणि उस्मानाबादला. पहा, संध्याकाळी ७॥-८ ला ही शाळा-कॉलेजातली पोट्टी बस-अड्डयाहून फिरून परतत आहेत. कसली चर्चा करतायत ते ? 'गुप्तरोगांनी पछाडलेली पुण्यातली तरुण पिढी !' या प्रिमातल्या दणकेबाज लेखाचीच !

काय म्हणता ? अगदीच विकळल्येत म्हणा की आपली पुण्याची मुलं. सारी पिढी गुप्त रोगानी पछाडल्येय् !

अण्णासाहेब, असे चिंतातूर होऊ नका. तो आपला आपल्या चाफाजीचा स्टंट होता, जाहिरातीचा. पुण्याचे आरोग्याधिकारी डोंगरे यांनी त्यांच्याकडे येणाऱ्या रोग्यांच्या पाहणीवरून असा निष्कर्ष काढला होता की, तरुण मुलांच्यात गुप्त-रोगाचे प्रमाण वाढत आहे. तावडतोब चाफाजीरावानी आठ कॉलमी मथळ्याचा स्पेशल रिपोर्ट देऊन टाकला-'पुण्याची चैनीला चटावलेली, वाममार्गाला लागलेली आणि गुप्तरोगांनी पछाडलेली तरुण पिढी.' ढिगानी उडाला प्रिमाचा अंक नंतर पंधरवडाभर कुणी ठेंच लागल्याने किंवा पाय मुरगळल्याने लंगडत चालणारा माणूस दिसला की, आजूबाजूला 'प्रिमा स्पेशल' अशी कुजबूज व्हायची.

पण मला सांगा, ज्याला वस्तुस्थितीचा काही आधार नाही असले सनसनाटी रिपोर्टस् लोक विश्वास ठेवून वाचतात कसे ?

लोकाचा विश्वास बसतो असं का तुम्हाला वाटतंय ? लोक मुळी परीकथा वाचाव्यात तसे हे रिपोर्टस् वाचतात. हा गुप्तरोगांचा विषय सोडा. निदान गुप्तरोग कोणा-कोणाला असतात तरी. पण अश्वत्थामा भेटल्याचा रिपोर्ट कोणी तरी विश्वास ठेवून वाचेल का ? पण आमचे चाफाजीराव असली भंकस बिनदिक्कत देत असतात.

पण चाफाजीरावाचा या सगळ्याशी काय संबंध ?

पहा गप्पात कसं होतं ते. प्रिमाचा विषय निघाला चाफाजीरावांवरनं आणि मी तुम्हाला हे सांगितलंच नाही की, चाफाजीरावाचं साप्ताहिक आहे प्रिमा हे.

पण हे चाफाजीराव करतात तरी किती उद्योग ? साखर कारखाना काढला, कॉलेज चालवलं, निवडणुकीला उभे राहतात अन् आता साप्ताहिकही काढलं ?

त्याचं असं झालं की, चाफाजीरावाचा बबन्या इंजिनिअर झाला. तेव्हा कारखान्याचा सारा कारभार चाफाजीनी त्याच्या हवाली केला. पण चाफाजीराव स्वस्थ थोडेच बसतात. त्यांची कारभारात घालमेल चालूच राहिली. तेव्हा बबन्याने म्हाताऱ्याचं गाठोडं पुण्याच्या 'गुणानंदन' बंगल्यात आणून टाकलं, शाळा–कॉलेजात जाणाऱ्या मुलां-लेकरांची देखभाल करीत चाफाजीराव पुण्यात राहिले. तेव्हा पुण्यात प्रसिद्ध होणारी साप्ताहिके नातवंडांच्या नादात त्यानी चाळली, आणि स्वतःच प्रिमा साप्ताहिक चालू केलं. म्हातारा मोठा हिकमती. आता स्वत.च छापखाना. प्रिमा, वास्तु नावाचं मासिक, चाफा–प्रकाशन असा मोठा पसारा घातलाय त्यानी.

पण चाफाजीराव म्हणजे मातीत वाढलेला माणूस. त्याला हा 'प्रिमा'ला मेकबिलीव्ह खपतो कसा ?

प्रश्न चाफाजीरावाना मेक–बिलीव्ह खपण्याचा नाही. लोकाना असलं रंजन आवडते ना ? मग काढा त्यातून पैसे हा व्यवहारी विचार त्याच्या मागे आहे. आणि पैसा म्हणाल तर तो चाफाजीना अगदी आभाळ फाटून मिळतो आहे.

## सार्वत्रिक तंद्री

पण लोकांना तरी हा चघळ-चोथा आवडतो कसा ?

छ्यः हा काय प्रश्न आहे ? लोकाना सिनेमे कसे आवडतात ? क्रिकेटची कॉमेन्ट्री पाच-पाच दिवस कान लावून ते कसे ऐकतात ? हटकून खोट्या ठरणाऱ्या राशी भविष्याची चर्चा कशी करतात ? या प्रश्नांना काही उत्तर आहे का ? तसंच लोक प्रिमा का वाचतात

या प्रश्नाला उत्तर नाही.

पण तरी काही तरी कारण शोधता येईलच की नाही ?

तुम्हाला इतिहासाचार्य राजवाडे माहीत आहेत ना ?

पण त्याचे इथे काय ?

त्यांनी पंचावन्न वर्षापूर्वी 'भरतखंडाच्या इतिहासाची मूलतत्त्वे' नावाचा लेख लिहिला होता.

हे पहा बघ्याजी, तुम्ही टँजंट जात जाऊ नका. ही आता मूलतत्त्वं कोठून उपटली ?

ऐका तर खरं. तर त्या लेखात त्यांनी भरतखंडाचा इतिहास ज्या प्रश्नाच्या अनुषंगाने लिहिला गेला पाहिजे असे म्हटले आहे, तो असा होता. भारतात आलेले धाडसी ऋग्वैदिक आर्य ढिले कसे पडले आणि मंदावत का गेले ? दुर्दैवाने ती लेखमाला राजवाडे पुरी करू शकले नाहीत.

म्हणजे त्या प्रश्नाचे उत्तर मिळालं नाहीच तर.

तसेच अगदी नाही. पंधरा वर्षापूर्वी नीरद चौधरींनी 'काँटिनंट ऑफ सिर्स' नावाचे पुस्तक लिहिलं. त्यात त्यानी म्हटले होते की, भारतभूमी ही चेटकी आहे. इथे जे कोणी परकीवंशाचे लोक येतात त्यांच्यातील धाडस, विवेचक आणि व्यवहारीबुद्धी, उपक्रमशीलता यांचा या भूमीच्या चेटकामुळे ऱ्हास होतो आणि ती माणसे कालांतराने धामी, मंदबुद्धीची आणि ढिली होत जातात. एखाद्या तंद्रीत असल्यासारखी इकडची सगळी माणसे जगतात. आर्य, ग्रीक, हूण, शक, अरब, मोंगल, या सगळ्याचे असे झाले. आपल्याकडचे आदिवासी जसे तंद्रीत असतात तसेच हे मूळचे सामर्थ्यशाली आणि उत्साही वंश भारतभूमीत वस्ती करून राहिल्यानंतर एका तंद्रीत काळ कंठायला लागले.

तुम्हाला पटतं का हे सगळे ?

मला पटण्याचा प्रश्न कुठे येतो ? तुम्ही म्हणालात ना की, चाफाजीरावाचे साप्ताहिक का खपते याची एखादी उपपत्ती सांगा म्हणून, तर ती सांगतोय्. तर सागायचा मुद्दा असा की, बरेचसे लोक तंद्रीच्या शोधात असतात किंवा तंद्रीत असतात. तुम्ही कधी सरकारी ऑफिसात गेलात तर तुम्हाला दिसेल, की बहुतेक कर्मचारी कामाशिवाय बसलेले असतात. मोकळेच. मग ते काय करतात ? कोणी पाय चाळवत असतात, कोण टेबलावर टिचक्या वाजवतात, कुणी खुर्ची तिरपी करून झोके घेतात, कोणी माना डोलावत असतात. कोणी तोंडावरच्या पुटकळ्या फोडत असतात. हे सगळं कशासाठी ! तर तंद्री लागावी म्हणून. प्रिमातले स्पेशल रिपोर्टस् असे तद्री लावण्यासाठी कराव्या लागणाऱ्या चाळचासारखे असतात. म्हणून तंद्रीच्या शोधात असणारी माणसं तसली साप्ताहिकं नि मासिकं वाचतात.

## गोळी कशी चढते ?

लोक तंद्रीच्या शोधात असतात हे मान्य केले तरी 'प्रिमा'तले रिपोर्टस् वाचल्याने त्याना तंद्री कशी चढते हे काही माझ्या ध्यानात येत नाही. एखाद्याला अश्वत्थामा भेटला किंवा तरुण पिढीला गुप्तरोग झालेला आहे किंवा कोण्या परदेशात बायकांच्या इंद्रियाना इजा करण्याची चाल आहे, या गोष्टी वाचून तंद्री कशी लागणार ?

*असं पहा, तंद्री म्हणजे काय ?* तर आपला भवताल विसरून कोणत्या तरी दूरच्या गोष्टीचे चिंतन करणे. दूरच्या म्हणजे कोणत्या, तर आपल्याशी कसलाही संबंध नसणाऱ्या. तंद्री लागायला हवी असेल तर आपल्याशी संबंधित नसलेली पण पुरेशी रसपूर्ण हकीकत पुरवली गेली पाहिजे. एखाद्याला अश्वत्थामा भेटला ही गोष्ट उघड उघड खोटी आहे. ती कोण्याही वाचकाशी लावून देखील संबंधित नाही. पण पुरेशी इंटरेस्टिंग आहे. चागला डोंगराएवढा अक्राळविक्राळ. डोक्यातून ज्वाळांचे पुजके बाहेर टाकणारा माणूस अस्तित्वात असेल तर त्यातून बऱ्याच गंमतीदार गोष्टी होण्याची शक्यता आहे. तो आपल्या गावात येईल असही मानायला हरकत नाही. त्यामुळे इतर काही नाही तर गेला बाजार नित्याच्या कामाला दोन-तीन दिवस दांडी मारता येईल ? कदाचित तेलासाठी त्या अश्वत्थाम्याने वाण्याचे दुकान फोडून नासधूस केली तर न जाणो उधारीची वही नाहीशी होईल. वाचलेल्या चारपाचशे रुपयातून काश्मीरलाही जाता येईल. पहा चालली की नाही तार लावत ? बरं, इतका सगळा विचार तपशीलाचा मसाला भरून तयार करण्यात गेला ना अर्धा पाऊण तास. पुन्हा हे सगळं वायफळ.

म्हणजे प्रिमाकडून वाचकांना दिवास्वप्नं पुरवली जातात म्हणा की.

दिवास्वप्नांना वस्तुस्थितीचा थोडा आधार असतो. शिवाय स्वप्ने पाहणारा, स्वत:च्या कर्तृत्वाने ईप्सित गोष्टी मिळाल्या असे मानत असतो, पण या अश्वत्थाम्याच्या बाबतीत स्वप्न पाहणाऱ्या वाचकाच्या कर्तृत्वाला वाव काही मिळालेलाच नाही.

हे 'अश्वत्थामा दिसला' या गोष्टीचे झाले. पण गुप्तरोगाच्या स्टोरीचे काय ? किंवा मागे दुसऱ्या एका साप्ताहिकात बापाचे मुलीशी, भावाचे बहिणीशी लैंगिक संबंध असणाऱ्या 'सत्यकथा' प्रसिद्ध होत होत्या आणि चवीने वाचल्या जात होत्या. त्याचं काय ?

'अनर्थाची अपेक्षा' हाही तंद्रीचाच एक प्रकार आहे. दिवसेंदिवस सगळा अध:पात होत आहे, नीतीतत्त्वं पायदळी तुडवली जात आहेत, चालू पिढी पूर्वीच्या पिढीपेक्षा आणि येणारी पिढी चालू पिढीपेक्षा अधिक निस्तेज आणि निष्कर्तृक आहे या कल्पना अनेकांना हव्याशा वाटतात. वाचक त्यानी कुरवाळला जातो. प्रिमासारख्या साप्ताहिकांचा, वाचकांना कुरवाळणे आणि अशा रीतीने त्यांना तंद्रीत पोचवणे हाही उद्देश असतो.

पण हे सगळं चाफाजीरावांना जमले कसे ?

तेच तर चाफाजीचे वैशिष्ट्य आहे. नाही तर आण्णासाहेब, तुम्हीही 'प्रिमा' काढले नसते का ? □

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा
मॅक्झिम गॉर्की
सुमती देवस्थळे
मूल्य दहा रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

## काबूल वार्ता

# " आज आमचं अफगाणिस्तान संपलं, मेलं "

प्रतिभा रानडे

जगाच्या नकाशावर अफगणिस्तान हे एक अगदी इवलेसे राष्ट्र दिसते. पण या राष्ट्रात अलीकडेच घडलेल्या घटनानी, जगाची शाती धोक्यात आली आहे. जग महायुद्धाच्या उंबरठयावर उभे आहे. इथे घडणाऱ्या घटनानी आणि जगभर उठणाऱ्या त्याच्या पडसादांनी मन सुन्न होते आहे. त्याचप्रमाणे काही अत्यंत महत्त्वाचे आणि मूलभूत स्वरूपाचे प्रश्न उभे राहतात.

इथे येवून आम्हाला आता चार वर्ष होतील. आता आताच एकदा गप्पाच्या ओघात, नुकत्याच होऊन घेलेल्या 'क्राती 'ची हकीगत कळली होती. दाऊदखानने रोमला डोळयाच्या ऑपरेशन-साठी गेलेल्या आपल्या काकाच्या माघारी सर्वसत्ता बळकावली होती. खरं म्हणजे त्याची तशी जरूरही नव्हती. दाऊदखान त्यावेळी इथला पंतप्रधान होता. सर्वसत्ता त्याच्याच हातात होती. जाहीरशहा नावाचाच शहा होता. तरीपण दाऊदखानने 'सरंजामशाहीचा बीमोड' करून 'लोकशाहीचे युग' चालू केले होते. त्यावेळी त्याला रशियाचा पाठिंबा होता. दाऊदखानने एके दिवशी जाहीरशहाच्या लोकांना आपल्या घरी मेजवानीसाठी बोलावले. भरपूर दारू पाजली. पहाटे हे लोक जेव्हा आपापल्या घरी जाण्यासाठी बाहेर आले तेव्हा दाऊदच्या लोकानी त्यांना सरळ तुरुंगातच टाकले ! आणि क्वचित कुठे कुणाला मारून दाऊदने ही 'क्राती' यशस्वी केली होती. या चमत्कारिक क्रातीची अशी सुरस हकीगत ऐकून तेव्हा मनात आले होते की, आपण इथे आहोत तेव्हा एखादी तरी क्राती, पहायला मिळू दे रे देवा !

आणि देवानं माझं म्हणणं अगदी मनापासून ऐकलं ! गेल्या चार वर्षात मी एक नाही तीन राज्यक्रात्या पाहिल्या. तीनही एकापेक्षा एक वरचढ आणि एकापेक्षा एक रक्तरंजित–नूरमहमद तराकी, हफिजुल्ला अमीन, बबरक कारमल आणि मोहम्मद कादीर या चौघानी एकत्र येऊन, दाऊदखानाचा सफाया करून २७ एप्रिल १९७८ रोजी पहिली क्राती घडवून आणली. आणि सर्व सत्ता काबीज केली. अफगणिस्तानच्या–इतिहासात प्रथमच सर्व सामान्य माणूस, कोणत्याही टोळीचा सरदार नसलेला असा बुद्धिवादी माणूस सर्वसत्ताधीश झाला. लोकाच्या दृष्टीने हे एक नवल वर्तले होते, लोकाना बेताचा आनंद झाला. त्याच्या मनात नव्या आशा निर्माण झाल्या, त्यासाठी कष्ट सोसायला, वाट पहायला लोकांची तयारी होती. नवे सरकारही मोठ्या जोमाने, आत्मविश्वासाने कामाला लागले होते. पण मग सोशॅलिस्ट आणि मार्क्सिस्ट तत्त्वज्ञान मागे पडून, नेहमीप्रमाणे फक्त सत्तास्पर्धाच सुरू झाली. आणि चारच महिन्यात 'इंपिरिलिस्ट' कादर तुरुंगात गेला. 'इंपिरिलिस्ट–पघूडे-लिस्ट' बबरक कारमल चेकोस्लोव्हाकियामध्ये राजदूत होता, तो तिथल्या तिथेच भूमिगत झाला. पाठोपाठ हजारो माणसं तुरुंगात गेली, मारली गेली, पाकिस्तानात पळून गेली. आणि मग 'इस्लाम धोक्यात आहे' या विचाराने पेटून उठलेल्या बंडखोरांच्या कारवाया सुरू झाल्या. त्यांना खरोखरीच्या भाडवलशाही राष्ट्रानी हस्तेपरहस्ते मदत केली यामध्ये तिळमात्रही शंका नाही. बडखोरानी उग्र रूप धारण केले. मध्येच अमेरिकन राजदूत मि. डब्ज यांना पळवून नेऊन मारण्यात आले. एक वेळ अशी आली होती की, काबूल, जलाला-बाद, हेरत, कंदाहार, मजारे शरीफ, कुंदुस ही मोठी शहरेच फक्त सोडून इतरत्र बंडखोरांचा कब्जा होता. एवढंच नव्हे तर हळूहळू अफगाण सैन्यातही फूट पडायला लागली होती. तराकीच्या राज-वटीला दीड वर्ष झाले होते, पण बंडखोराच्या कारवाया सतत वाढतच होत्या.

हॅवानाच्या नॉन अलाईन्ड नेशन्स कॉन्फरन्सहून परत येताना तराकी–मॉस्कोला थाबला असता, ब्रेझनेव्हने त्याला विचारले, 'अजून तुम्हाला बंडखोरावर विजय मिळवता आला नाही ?'

तराकीने उत्तर दिले, 'अमीनमुळेच हे काम शक्य होत नाही.'

'मग अमीनलाच उडवून लाव.' ब्रेझनेव्हने सल्ला दिला.

पण ही अत्यंत गुप्त मसलत, तराकी बरोबर असलेल्या अमीनच्या माणसांनी त्याला सांगितली.

अर्थातच ही हकीगत तराकी गेल्यानंतरच झिरपत झिरपत सगळीकडे पसरली होती.

अमीनला अगोदरच सुगावा लागल्यामुळे, त्यानेच तराकीचा काटा काढला. तराकीला प्रत्यक्ष कुणी मारले हे अजूनही नक्की कळले नाही. तरीपण जिन्यावरून येणाऱ्या अमीनला मारण्याचा प्रयत्न झाला, त्यापाठोपाठ जो गोळीबार सुरू झाला त्यामध्ये तराकी भयंकर जखमी झाला. आणि आठ दिवसाच्या बेशुद्धीनंतर हॉस्पिटल-मध्ये मरून गेला. आता तर अफगाण लोकात, सैन्यात तीन गट तयार झाले तराकीचे पाठीराखे, अमीनचे पाठीराखे आणि बंड-खोरांचे पाठीराखे. अमीनही आज नाही उद्या जाणार हे तेव्हाच निश्चित झाले.

अमीनने तराकीला इंपिरिलिस्ट ठरवून स्वतःचा कारभार सुरू केला. अमीनने पहिले काम केले ते रशियन राजदूत पुसोनोंव्हला परत पाठवले ! कारण तो तराकीला सामील होता, एवढेच नव्हे तर जेव्हा खल्क पॅलेसमध्ये मारामारी झाली तेव्हा तो स्वतः तिथं हजरही होता !

दुसरी गोष्ट त्याने केली ती म्हणजे, तुरुंगात मेलेल्यांची नावे

जाहीर करायला सुरुवात केली, पहिल्या दिवशी ५ हजार नावे, दुसऱ्या दिवशी ७ हजार नावे. मग दोन दिवसाच्या सुट्टी नंतर ती यादी ११ हजारापर्यंत गेली. रोज हजारो स्त्रीपुरुष, मुलं, म्हातारे, मिनिस्ट्री ऑफ इंटिरिअर्ससमोर गर्दी करू लागले. ज्यांच्या माणसाची नावं—मेलेल्याच्या यादीत होती, ती बायका पुरुष सरकारच्या नावाने शिविगाळ करू लागले, अमीनला जीवे मारणाची धमकी देऊ लागले. हा देश मुस्लिम. इथल्या बायका पडदा पाळणाऱ्या, तेव्हा त्या बायकांना शिपाई धक्के देऊन हाकलूनही देऊ शकत नव्हते. रोज त्या मंत्रालयासमोर उत्पात घडत असे. शेवटी कंटाळून सरकारने यादी प्रसिद्ध करण्याचं बंद केलं. त्या दिवशी मृतांची संख्या तीस हजार होती.

अमीनची कल्पना होती की 'सगळी माणसं तुरुंगात टाकली, मारली ती तराकीने !' या त्याच्या म्हणण्यावर लोक विश्वास ठेवतील. पण कुणाचाही विश्वास बसणंच शक्य नव्हतं. कारण तराकी प्रेसिडेंट असताना, पतप्रधान अमीन सिक्रेट पोलिसचाही मुख्य होता. इंटेलिजन्स डिपार्टमेंटही त्याचाच हाताखाली होते ही गोष्ट जगजाहीर होती, शेवटी शेवटी तर डिफेन्स मिनिस्ट्रीही त्याने आपल्याच हातात घेतली होती, तराकीपेक्षा अमीनचीच हुकुमशाही जास्त चालत होती हे उघड सत्य होतं. कर्फ्यु सुरू झाल्यानंतर मध्यरात्री घराघरात शिरून लोकांना पकडून नेत होते, हालहाल करीत होते, विनाकारण वाटेल तसे मारले जात होते, या गोष्टीला अमीनच जबाबदार आहे ही गोष्ट तराकी जिवंत असतानाच लोकांना ठाऊक होती. अमीन विरुद्धच्या गुप्त कारवाया चालू झाल्याच होता.

## २६–२७ डिसेंबर

आणि या सगळ्या भानगडी चालू असताना बंडखोराशी लढाई चालूच होती. पण आता थंडीला सुरुवात झाली होती. कुठेकुठे तर बर्फ पडायलाही सुरुवात झाली होती. बंडखोराना डोंगरदऱ्यातून लपून युद्ध करणं अशक्य होतं. त्याच्या कारवायाही थंडावल्या होत्या. सरकारने एकापाठोपाठ बंडखोराची ठाणी काबीज करीत आणली होती. आणि त्याचवेळी एकदम २४–२५ डिसेंबरला आकाशामध्ये विमानांच्या घिरट्या चालू झाल्या साध्यासुध्या नाहीत तर सतत, न थांबता, दोन दिवस, दोन रात्री ही विमानं काबूल शहरावर घिरट्या घालत होती. रात्री झोप लागणं सुद्धा अशक्य झालं. काबूलच्या निळ्याभोर आकाशात एकही विमान नाही—असा अर्धा तास काही रिकामा जात नव्हता. हेलिकॉप्टर्स, बॉम्बर्स, पॅसेंजर प्लेन्स, सुपरसॉनिक जेट अशी वेगवेगळी विमानं होती. त्याबाबतीतलं माझं तांत्रिक–ज्ञान अगदीच जुजबी, पण रात्री जी विमानं येतात–जातात त्याचा आवाज वेगळा–दमदार असतो, शिवाय ही विमानं फक्त घिरट्या घालीत नाहीत, तर एका बाजूनं येतात आणि दुसऱ्या बाजूनं जातात...रात्रीच्या अंधारात हे लोक रशियन सैन्य, दारूगोळा तर इथे आणत नसतील ना ? या माझ्या शंकेचं लोकांनी हसं उडवलं. 'तुम्ही लेखक लोक, पण तुमची कल्पनाशक्ती एवढी तरल होऊ देऊ नका,' असा प्रेमळ सल्लाही मिळाला. सर्वांचं म्हणणं पडलं, एवढंच नव्हे तर काहींनी अगदी 'खास, आतली बातमी' म्हणून सांगितलं की, 'सरकार आता बंडखोरावर शेवटचाच, निकराचा हल्ला करणार आहे, त्यासाठी काही नवीन विमानं मागवली होती, त्यावर सरकारचे पायलट लोक प्रॅक्टिस करत आहेत.' (२६ डिसेंबरला बी. बी. सी., व्हॉईस ऑफ अमेरिकाने रशियन सैन्य काबूलमध्ये आणले गेल्याची बातमी दिली तरी लोकाचा त्यावर विश्वास बसायला तयार नव्हता !)

पण कुणाच्याही दुष्ट शंका कधीच खोट्या ठरत नाहीत. माझी दुष्ट शंकाही खोटी ठरली नाही. २६ डिसेंबरच्या दुपारपासून २७ डिसेंबरच्या दुपारपर्यंतचा वेळ अगदी शांत गेला. विमानांचा घरघराट एकदमच थांबला होता आणि २७ ला संध्याकाळी ६॥ च्या सुमाराला रशियन सैनिकानी भरलेले रणगाडे काबूल शहराच्या मुख्य रस्त्यावरून धडधडत जाऊ लागले. अंधार एवढा होता की, ते लोक रशियन आहेत हे लोकाच्या तेव्हा लक्षात आले नाही. पाठोपाठ ७–७। वाजता लढाईच चालू झाली. रशियन्सनी सर्वात प्रथम काबूल रेडिओ, टी. व्ही. बिल्डींग्ज हस्तगत केल्या. दारुलअमनचा नवा राजवाडा हस्तगत केला. ७–८ दिवसापूर्वीच अमीन इथे रहायला गेला होता, खल्क राजवाडा हस्तगत केला. काबूल विमानतळ तर सुरवातीपासूनच त्यांच्या हातात होते; काबूल सरहद्दीवर असलेला सैनिकी ठाण्याभोवती रशियन रणगाड्याचा वेढा पडला, मुख्य चौकात रणगाडे उभे होते, सगळ्या मुख्य रस्त्यांची नाकेबंदी झाली आणि अमीनला मारून दोन–तीन तासात बबरक कारमलचा अंमल चालूही झाला. त्या रात्रीच्या अंधारात आणि फायरिंगच्या धडधडधडाटात–या भानगडीत–कोणी परकेच प्रत्यक्ष गुतले आहेत याची शंकाही कुणाला आली नाही. सगळ्याना वाटले दाऊदला मारून तराकी आला, तराकीला मारून अमीन आला तसाच अमीनला मारून आता बबरक आला. हजारो लोकाना मारणारा जुलमी अमीन गेला म्हणून लोकाना केवढा आनंद झाला होता !

दुसरा दिवस शुक्रवार. सुटीचा दिवस. सकाळपासून काबूल रेडिओवर आलटूनपालटून पुश्तू आणि फारसी भाषेत 'अमेरिकेचा एजंट' अमीनवर ताशेरे झाडायला आणि खरोखरच्या डेमोक्रॅटिक, सोशॅलिस्ट बबरकचे गुणवर्णन चालू झालेच होते. ९ वाजता नेहमीप्रमाणे टी. व्ही. सुरू झाला आणि ज्या तराकीला 'अमेरिकेचा एजंट' ठरवून अमीनने मारले होते, त्याच तराकीचा फोटो टी. व्ही. वर झळकला ! नूर महमद तराकी आता नव्या अफगाणिस्तानचा राष्ट्रपिता झाला आहे नाहीतरी प्रत्येक राष्ट्राला असा कोणीतरी राष्ट्रपिता लागतोच !

अशी काही गडबड झाली की आमच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे आम्ही हातातल्या पर्स, पिशवीमध्ये कॅमेरे लपवून बाहेर पडलो आणि सगळ्या मुख्य रस्त्यावर, चौकाचौकांतून शेकड्यानी रणगाडे, रशियन सैनिक, मशिनगन्स रोखून गस्त घालताना दृष्टीस पडले ! असं काही बघायला मिळेल याची तसूभरही शका मनात नव्हती, हृदयात एकदम धक्क झालं ! हे तर चक्क एका देशाने दुसऱ्या देशावर केलेलं आक्रमण होतं. रस्त्यावर शेकड्यानी रशियन सैनिक दिसत होते. पण अफगाण सैनिक मात्र एकही दिसत नव्हता ! हातात दंडुकाही नसलेले ट्रॅफिक पोलीस तेवढे केविलवाणेपणानं उभे होते. सगळ्या शहरावर मरणकळा आल्यासारखी दिसत होती. लोक भयंकर घाबरलेले दिसत होते. कोणी कुणाशी एक चकार शब्दही बोलत नव्हतं. जत्रा भरल्यासारखे शेकड्यांनी लोक, अगदी बुरखे

घेतलेल्या बायकाही शहरातून हिंडत होत्या. पण फक्त कुजबूज चालू होती. गाड्यांचे हॉर्नसुद्धा कोणी वाजवत नव्हते. कित्येक वर्षांपासूनची रशियाची इच्छा पूर्ण झाली होती. अफगाणिस्तान रशियाने काबीज केले होते.

◘

त्या दिवशीच्या सकाळचे दोन प्रसंग सांगण्यासारखे आहेत. कारतेपरवान भागात जाताना टॅक्सीवाला म्हणाला, 'कशाला जाता तिकडे, तिथे खूप टॅन्क्स आहेत.'

'वा! तेच तर बघायला जात आहोत. अफगाणिस्तानच्या बहादूर लोकांनी एवढी लढाई केली ती पहायला नको का? आम्ही जरासं विनोदानं म्हणालो.

'कसलं आलय बहादूर अफगाणिस्तान? इमरोज अफगाणिस्तान मुर्दा शुद. (आज आमचं अफगाणिस्तान संपलं, मेलं.) आजपासून हे शोहरवीस्तान (रशियास्तान) झालंय.' निराशेनं, अपमानानं चिडून, तो म्हणाला.

नेहमीप्रमाणे चोरूनमारून फोटो किंवा फिल्म घेण्याची इच्छा होती. पण एवढ्या शेकडो सैनिकांच्या पहाऱ्यात हे प्रयत्न करूनही जमेना. म्हणून शेवटी एका ठिकाणी २-३ रशियन आर्मी ऑफिसर्स उभे होते. त्यांच्याजवळ जाऊन त्यांना अगोदर इंग्रजीत मग फारसी फोटो घेऊ का म्हणून विचारलं. त्यांना काही कळेना किंवा कळूनही त्यानी कळत नाही असं दाखवलं. आजूबाजूला पोराटोरांची गर्दी जमली ट्रॅफिक पोलिस आला. त्याला म्हटलं, 'तू विचार त्यांना फोटो घेऊ का म्हणून' 'फोटो कसले घेता? जा...जा...' काळवंडलेल्या चेहऱ्यानं तो म्हणाला.

ऑफिसमधल्या आरेफ राझाला म्हटलं, 'हे बघ, मला फोटो फिल्म घ्यायची आहे. तू चल माझ्याबरोबर.' तो एकदम रागावला. आपल्याकडच्या भिकाऱ्यांचे, झोपडपट्टीचे, फोटो फिल्म कुणी घेतली तर आपल्याला राग येईल तसा त्याचा राग होता. म्हणाला, 'फोटो कसले घेता?' मी म्हटलं, 'हे बघ, मी हिंदुस्थानातल्या लोकांना कळावं म्हणून लेख लिहिणार आहे, फोटो छापणार आहे. त्याना कळू दे इथं काय झालं ते.' तेव्हा मग म्हणाला, 'जरूर लिही. तुमच्या लोकाना जाऊन साग इथं काय काय झालं ते आणि हेही साग की, आज नाही उद्या आम्ही यांच्यातल्या प्रत्येकाला ठार मारू, याना आमच्या देशातून हाकलून देऊ. वर्ष, दोन वर्ष, २५ वर्ष लागली तरी हरकत नाही, पण एकही रशियन आम्ही इथे शिल्लक ठेवणार नाही.'

आणि ही भावना इथे सर्वत्र आढळली. टॅक्सीवाले, भाजीवाले, ऑफीसमध्ये कामं करणारे सर्व थरातले लोक, बबरकच्या परचमपार्टीचे काही मूठभर लोक सोडले तर बरेचसे पार्टीवर्कर्सही नव्हते. तर आता हळूहळू बाहेर आलेले आर्मीमधले लोकही तीच भाषा बोलत आहेत. आता काबूल शहरातून रणगाडे, रशियन सैन्य काढून घेतलं आहे. तरीपण शहरवेशीवर काही मोक्याच्या ठिकाणां अजूनही त्याचे वास्तव्य आहेच आणि तिथेच, कधी चुकून, तर कधी मुद्दामहून, कधी अफगाण सामान्य नागरिक तर कधी अफगाण सैनिक रशियन रणगाड्यावर, सैनिकावर हल्ले करत आहेत आणि मरत आहेत. एकेकाळी अफगाण सैन्यामध्ये जनरल असलेला आमचा घरमालक म्हणाला, 'आम्ही ब्रिटिशांनाही हाकलून दिलं तिथं रशियनाना काय दाद देऊ आम्ही?'

'पण त्यावेळी तुमचे राज्यकर्तेही ब्रिटिशाविरुद्ध होते. आता तर तुमचेच लोक रशियनाना सामील आहेत.' या माझ्या उत्तरावर तो म्हातारा मान हलवत म्हणाला, 'केवढी शरमेची गोष्ट आहे ही आम्हाला. आमच्याच लोकांनी गुलामी पत्करली आहे. पोलंड, चेकोस्लोव्हाकिया, हंगेरी... आणि आता अफगाणिस्तान. हे रशियन आम्हाला जड जाणार आहेत.'

## निमंत्रण आले की घेतले?

आज एका मुद्द्यावर चर्चा सुरू आहे की, अफगाण सरकारने मैत्रीच्या करारानुसार, रशियन सैन्य, रणगाडे आपणहून मागवले होते की नव्हते? याचं खरं उत्तर कदाचित कधीही मिळणार नाही. मिळून उपयोग तरी काय म्हणा? कारण जर मुळातच रशियाने इथे यायचं हे ठरवलेलंच होतं तर निमित्त काय कोणतेही देता येते. एक हकीकत कानावर आली ती अशी की, अमीनने रशियाकडे युद्धसामग्रीची मागणी केली होती, ती विमानं त्याचसाठी येत होती. बबरकही त्यातल्याच एका विमानातून इथे आला. पण जेव्हा रशियन सैन्यही येऊ लागले तेव्हा अमीनने विरोध केला किंवा अमीन विरोध करील या अपेक्षेने त्याला अगोदरच जेवणातून भरपूर अंमली पदार्थ खायला दिले गेले आणि जेव्हा सगळी तयारी संपूर्ण झाली तेव्हा अर्धमेल्या अमीनला मारून, बबरकची हुकूमत जाहीर करण्यात आली. तेव्हा अफगाण सरकारने आमंत्रण देऊन रशियन सैन्य बोलावले की नाही हा प्रश्नच गैरलागू आहे. कारण इथे यायचेच हे अगोदर ठरलेलेच होते. कित्येक वर्षांपासूनच. म्हणूनच रशियाने दाऊदला मदत केली, तराकीला मदत केली, अमीनचे हार्दिक अभिनंदन सर्वप्रथम ब्रेझनेव्हनेच केले आणि आता बबरकला हाताला धरून रशियानेच गादीवर बसवले. अफगाणिस्तानच्या रक्षणाचा संपूर्ण भार आता रशियानेच उचलला आहे. दाऊदखानचा म्हातारा काका, जाहीरशहा ६-८ महिन्यापासून पाकिस्तानात येऊन बसला आहे. अमेरिका, चीन आता बडखोराना उघडपणाने मदत करणार आहे. विस्कळीत बंडखोराची एक गठडी वळण्याचा प्रयत्न करणार आहे. यू. एन. असेंब्लीत चर्चा झालीच आहे. महायुद्धाच्या भोज्याला हात लावून परतलेल्या जगामध्ये शीतयुद्धाचे गरम वारे वाहतील आणि बडी राष्ट्रे, स्वतःला कसलीच झळ लागू नये म्हणून, आपापली भांडणं तिसऱ्याच एका लहानशा देशात जाऊन लढतील. खरा प्रश्न आहे तो असा की, अफगाणिस्तानसारख्या छोट्या, विकसनशील राष्ट्राना, आजच्या या अमर्याद सत्तास्पर्धेच्या जगात स्वतंत्रपणाने जगताच येणार नाही की काय? टपून बसलेल्या कोणत्या तरी एका बड्या राष्ट्राच्या पंखाखाली जाण्यावाचून त्याच्यापुढे इलाजच नाही की काय?

एक विचार मला भयकर अस्वस्थ करतो आहे. आर्यांपासून, हूण, ग्रीक, इस्लामी टोळीवाले हिंदुस्थानावर चालून आले ते खैबर खिंडीतूनच आले. उद्या रशियाही त्याच 'सिलकरूट'चा वापर करणार आहे का?

मार्क्सिझम, सोशॅलिझम पुस्तकातून किती प्रामाणिक, न्यायी वाटतो. पण या इझम्स्च्या नावाखाली जेव्हा घराघरातून निर्दोष माणस मारली जातात, आपल्याच रस्त्यारस्त्यावरून परकीयाचे सैनिक आपल्यावरच मशीनगन्स रोखतात तेव्हा सगळे संदर्भच गरकन फिरतात. ◻

कथा

# स्वार्थ

मोहन खडसे

आज तिला जाणवलं. निखळ स्वार्थी होण्याची वेळ येऊन ठेपली आहे. लहानपणापासूनच वेदनांशी संघर्ष करीत आली. जगण्यातला एक भाग म्हणून. कर्तव्य म्हणून. घरात आता सारं सुरळीत झालं आहे. बापे पेन्शनर्स असोसिएशनचा अध्यक्ष आहे. आई नातवाना खेळविण्यात गर्क असते. अनिता चित्तरंजन सोबत ....... सर्व वस्तू आपल्या ठिकाणी व्यवस्थित आहेत.

तिची गरजच नाही उरली ह्या घरात. लग्न करायचं आहे म्हणून बापाच्या कपाळाला आठ्या पडतात. पी. एफ. मधून हुंडा द्यायचा म्हणजे त्याला काळीज कापून दिल्यासारखं वाटतं. आतापर्यंत घरातील कसलाही प्रयत्न हा सामूहिक स्वार्थ होता. पण आजचा तिचा प्रयत्न हा तिचाच स्वार्थ. शंभर टक्के तिचाच. पर्स गळ्यात अडकविली. घराबाहेर आली. समोरच्या स्टोअर्समधून पॉपिन्सचं पाकिट घेऊन पर्समध्ये ठेवलं. रिक्षा करून सरळ बसस्टॅंडवर आली. तिकीट काढून बसली. अखेरचा प्रवास करीत. उन्हाळ्याची फुकट देणगी म्हणजे घाम. इवल्याश्या रुमालाने घाम पुसत ती बसमध्ये डुलक्या घेऊ लागली.

□

उन्हाळा जोरात आहे. एप्रिलची तरुण दुपार. पाढरी फटफटीत. विधवेच्या कपाळासारखी. तितकीच उदाससुद्धा. न संपणारा रस्ता अन् त्यावर असहाय्यपणे लोंबकळत असलेल्या जिभेचा भार सोसत जात असलेली म्हातारी कुत्री. सावकाशपणे रस्ता पार करण्याच्या प्रक्रियेत ती. त्याच रस्त्यापलीकडच्या झोपडीत एक हॉटेल. मी आत आलो. ऑर्डर सोडली—एक कडक मिठी. मळकट कपड्यातला मुलगा पिवळ्या डोळ्यानी पाहत गेला. पलीकडे भट्टीवाल्याकडे ऑर्डर पोहचवली त्याने. उकळत असलेला चहा अन् त्यासमोर घामाने चिंब झालेला तो ढेरपोट्या. कुठेतरी पाहत.

तेवढ्यात मुलानं चहा आणला. जुनाट टेबलावर आपटीत न पाहताच निघून गेला. जिकडून आला तिकडेच. काहीही न केल्यासारखं पाणी घशाआड केले. मग शेठकडे नजर टाकली. त्याची असाधारण नजर. वरवर काहीच दिसत नाही त्यात. पण आहे. त्यासाठी सामसूम रस्त्यावर असं हॉटेल घालावं लागेल. अन् मालक म्हणून बसावं लागेल तेरा—चवदा तास सततपणे.

मी चहाचा घोट घशात लोटला. त्याबरोबर डोकेदुखी बाहेर. रुमालानं चेहरा पुसत दूरवरून येणाऱ्या एस. टी. कडे नजर. कुणीतरी यावं म्हणून.

एस. टी. थांबली. तिची झोपसुद्धा. बाहेर आली. कंटाळ्याने चोहोकडे पाहिले अन् पर्समधून पॉपिन्सचं पाकिट काढून त्यातील हिरवा तुकडा तोंडात.

तेवढ्यात ती म्हातारी कुत्री तिथं आली. शेपटी हलवीत. एक गोळी तिलाही.

कुत्रीन गोळी हवेतच झेलली अन् कट्‌कट् आवाज करीत मान पुन्हा वर केली. थरथरती अन् केविलवाणी नजर. एव्हाना कुत्रीकडे पाहात होतो. तेवढ्यात मुलगी कुठे गेली देव जाणो. भुत असावी. कशी गेली असेल मग येथून. झोपडीबाहेर येवून गॉगल चढविला. कॅप चढवित चोहोकडे नजर फिरविली. कुठेच दिसेना.

"क्यों सेठ लडकी कहाँ गयी ?"

शेठ काहीच बोलला नाही म्हणजे समजावे त्याला माहित नाहीत नाही. माहित असतं तर काहीतरी बोलला असता. हा मुका होऊन नकार देतो.

आपणच थोडंफार चालत जाऊन पहावं. चालणं. परंपरागत चालणं. मी निघालो रस्त्यावरून. भेसूर एकटा रस्ता अन् पानाशिवाय सापळा झालेली कडूलिंबाची सरकारी झाडे. एखादी मैना तेवढी कोपऱ्यात उन्हापासून लपत आड बसलेली. खोट्या आत्मविश्वासाने. नाहीतर हवेत उडत असल्यासारखा अशोक—ले—लॅंड चा भरगच्च भरलेला ट्रक धावत जातो. बाकी मोकाट सुटलेला रस्ता.

मी पुढे अन् रस्ता मागे.

मग जाणवलं की, मला पूर्वेकडे जायचे होते पश्चिमेऐवजी. मार्ग धरला तो सोडायचा नाही. चुकीचा असला तरीही. कारण अश्या धरपकडीमुळे मार्गही फार काळ आपल्याजवळ राहात नाही. घशाला पडलेली कोरड आपल्याच घामाने भागवावी इतका घाम अव्याहतपणे सुरू.

मी सारखा चालतच होतो. दीड तासापासून. मग रस्त्याच्या कडेला उताणी पडलेली मुलगी दिसली. धावतच तिच्याजवळ गेलो. अजून स्वार्थी झाली नव्हती. जिवंत होती. मेलेलं मूल गाडण्यासासाठी हातावर उचलून नेतात तसं तिला उचललं. पर्स खाली राहिल्याने पुन्हा तिला खाली ठेवले. पर्स तिच्याच गळ्यात अडकवली अन् पुन्हा त्याच झोपडीत. शेठ मला पाहाताच गालात हसला. गल्ल्यावरून खाली आला. रस्त्यापलीकडच्या कडूलिंबाच्या खोडावर बराच वेळ मुतत बसला.

जुनाट फर्निचरवर उताणी मुलगी. अन् तिच्या पायाजवळ हसत असलेली भट्टी. कोपऱ्यात बेंचवरच निद्राधिन झालेला, ढेरपोट्या, तंबाखु—चुना घोळत बाहेर बसलेला. शेठ पैजामा चोळत आला पुन्हा गल्ल्यावर गेला. जर्मनच्या भल्यामोठ्या गंजातील पाणी शिंपडीत. मी उभा. ती बेशुद्धच.

दुसरा लोटाभर पाणी पाहून शेठ घाबरला.

पोरगी स्वार्थी तर झाली तर झाली नाही. गल्ला सोडून खाली यायला, लागला. एवढ्यात ती जोरात किंचाळली.

'किती गरम भट्टी आहे ही !' शेठ गालात हसला. आल्या पावलानं परत गेला. गाला हसत.

'हो आहेच' शेठ म्हणाला. सकाळपासून हो म्हणण्याची वेळच आली नव्हती. हा शब्द पहिल्यादाच.

ती उठली. घाबरतच. मग पलीकडच्या ड्रममधील पाण्यानं चेहरा धुतला. पदराने पुसत जुनाट टेबलावर बसली. एक कडक मिठी. तिनंही ऑर्डर सोडली. मग पर्समधून कागद काढला. चिमुकला पेनसुद्धा. टेबलावर लिहिणं सुरू केलं. मी नुसता प्रेक्षकासारखा खामोशपणे पाहत उभा. मग मळकट कपड्यातील मुलानं चहा आणला. कपानेच ओठांना चहा लावला.

मग पुन्हा पॉपिन्सचं पाकीट काढून

त्यातील पिवळा तुकडा तोंडात टाकणार एवढ्यात कुत्रीचा किंचाळण्याचा आवाज. ती थांबली.

बाहेर आली. रस्त्यावर अशोक-ले-लँडच्या ट्रकखाली कुत्रीची मान सापडली होती. रस्त्याशी एकरूप झाली होती. तिनं तुकडा तोंडात टाकला.

तीक्ष्ण उन्हाकडे पाहत चिठ्ठी पाकिटात बंद केली. माझ्याजवळ आली. एक तुकडा मलाही दिला. स्माईल देत थँक यू म्हणाली. मग पाठमोरी होत सरळ निघाली. खांद्यावरून हात उंचावून बाय करीत निघांनाही पाहिलं. शेठ जवळ आली. पर्समधून चहाचे पैसे दिले.

सोबत पाकीट सुद्धा.

साली शेठकडे......ती निघाली. भकास चेहऱ्याने वाचत असलेला शेठ. शेठच्या डोळ्यांतून भट्टी आग ओकत होती. अन् पाण्यातून घाम. मी चिठ्ठी हिसकावली.

शेठ भेदरलेल्या नजरेनं मला पाहू लागला. मी चिठ्ठी वाचू लागलो.

'प्रिय,

लोक म्हणायचे ह्या झोपडीत स्वार्थ सापडतो. शेठ, तरुण मुलगा मळकट कपड्यातला मुलगा अन् ढेरपोट्या मिळून इथं येणाऱ्याला खलास करतात. उजव्या हाताच्या मनगटाजवळ ठासाबा कापून. पण माझ्या सोबत अशी हिंमत कुणाचीही झाली नाही. तेव्हा शेवटचा स्वार्थ मलाच शोधावा लागला. अर्थात तो लवकरच शोधण्याचं कारण म्हणजे बापाचं लग्न करायचं प्रश्नामुळं नाक मुरडणं. मार्ग मला कुत्रीनं मॉडेल म्हणून दाखविला. आता खाली नाव लिहून काय उपयोग ? तुम्हाला अन् मलाही. बस एवढंच.

माझीच मी.'

मी शेठकडे पाहिलं.

काही बोलणार एवढ्यात भयानक किंकाळी. वाराचिरत मी बाहेर आलो. त्याच कुत्रीजवळ तिनंही आपली मान अशोक-लेलँडच्या ट्रकखाली ठेवून दिली. मात्र पॉपिन्सची एक गोळी पाकिटात राहून गेली. लाल रंगाची. तिचा शेवट म्हणून.

आता तीसुद्धा रस्त्यापलीकडच्या कडूलिंबाच्या झाडासारखी बेवारस.

पण तिचा स्वार्थ मिळविलेली. ☐

# पुस्तके

## मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे

**एक अस्वस्थ करणारा अनुभव**

ज्यांचं आयुष्य काळ्या दिवसांनी बनलेलं आहे, जे वर्ग वर्णदृष्ट्या शोषिले गेले आहेत. अशा शोषितांत निर्माण झालेली जागृत जाणीव आणि त्याद्वारा मराठीत नव्याने येणारे साहित्य हे खरोखरच समर्थ आहे. 'दलित साहित्य' हा वादाचा मुद्दा उपस्थित करणारे आणि त्यावर झोड उठवणारे, त्यांचे ते जाणोत. साहित्य किंवा कलाकृती म्हणून एखादे पुस्तक अभ्यासले जावे. खरी जीवनमूल्ये प्रतिबिंबित असलेलं कोणतंही पुस्तक मराठी वाचकांनी वाचायला प्रवृत्त व्हावं, चर्चा व्हावी, योग्यायोग्यता ठरावी. सत्यउकल व्हावी अशी समीक्षा मराठीतील समीक्षक देत नाहीत. त्यामुळेच बोथट साहित्य निर्मिती होत राहिली.

सध्या अपेक्षा उंचावणारी, नवं अस्तित्व घेऊन आलेली काही पुस्तके खरोखरच सरस आहेत. 'आठवणींचे पक्षी', 'बलुतं', आणि मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' या तीन पुस्तकांचा त्यात समावेश आहे. पुस्तक बाहेर येण्यात बरेच अंतर आहे; पण तो मुद्दा सोडून या तीन पुस्तकांचा एकत्र विचार खूपच उपयुक्त ठरेल. पण काही मर्यादांमुळे एकाच पुस्तकाचा विचार प्रस्तुत लेखात मी करणार आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात प्राथमिक शिक्षकाचं कार्य करणाऱ्या एका दलित शिक्षकाच्या आयुष्यातील काळ्या दिवसांचा जीवनपट 'मुक्काम पोस्ट'मध्ये आढळतो. मात्र 'सोशिक' कोकणी माणसांसारखे कोंडविलकरांचे सर्व अनुभव अलगद उतरल्याचे आढळते. भोवतालच्या परिस्थितीत मिसळण्यास मज्जाव असल्यामुळेच सात-आठ घरांच्या सानिध्यात वाढलेला हा माणूस तसा मूक आहे. अनुभवाचं भांडवल अतिशयोक्तीनं न खुले करता केवळ तीन मडक्यांच्या गाळण्यातील स्वच्छ पाण्यासारखा अनुभवच या पानापानावर आढळतो. विद्रोह, नकार या सतत वापरून गुळगुळीत होणाऱ्या गोष्टींना थोडा फाटा देऊन केवळ बाभळीच्या बुंध्यासारखं घट्ट कथानक इथे आढळते. चांभार समाजातील अनेक गोष्टींची उकलसुद्धा उपयुक्त ठरावी. जवळजवळ आठ वर्षांच्या कालखंडात लेखकाला आलेले अनुभव त्याने इथे मांडले आहेत.

आत्मचरित्र लिहायचे तर वेगळे जीवन जगलो असतो; असं शरच्चंद्र म्हणाले होते. पण काहींचं जीवन हे आधीच चरित्रमय झालेलं असतं. त्यात कोंडविलकरांचा समावेश आहे. सत्य, पिळ असलेले धुमसते, बेचैन, अस्वस्थ करणारे अनुभव. त्यास्तव त्याच पिळाचे प्रादेशिक शब्द आणि आगळेपण हे या पुस्तकाचे वैशिष्ठ्य होय. 'ही डायरी नाही.' समाजबदलासाठी उद्युक्त असलेल्या एका तरुण शिक्षकाची ही विदीर्ण कहाणी आहे. एखाद्याच्या आयुष्यात किती भयंकर घटना घडतात त्याची केवळ नोंद आहे. वाङ्मयप्रकार, तंत्र, या विचारातून चष्मा लावून या पुस्तकाकडे बघण्यापेक्षा एका नवोदित लेखकाचं समर्थ पुस्तक म्हणून इकडे पाहिल्यास योग्य ठरेल का ? जुन्या त्याच निकषांवर घासून हे पुस्तक पाहायचे का ? प्रश्न अनेक आहेत. आणि जेव्हा एखादं पुस्तक

असे प्रश्न निर्माण करतं, तेव्हा ते अस्सल असतं असं माझं मत आहे.

भारतीय समाजरचनेने फेकलेल्या, वहिष्कृत केलेल्या एका शिक्षकाची ही समस्या आहे. जात ! 'टाक्यात टाकलेल्या चामड्याला चुना रंग चिकटावा, तशी ही जात मला जन्मापासून चिकटलेली आहे. आता मी जा म्हटल्यास जाणार नाही. जोपर्यंत ही जात आहे तोपर्यंत हा प्रश्न आहे !" असे कोंडविलकर प्रथमच स्वतःचे दुखणे बोलून दाखवितात. लहानपणी कोपऱ्यात बसून शिकलेले लेखकाचे बालमन व व शिक्षक झाल्यानंतर स्पर्श झाला म्हणून आघोळ करणाऱ्या मुलांना पाहिल्यानंतरचे मन यातील दुभंगलेपण पवित्र पेशाला एकवेळ लोक मानतात पण 'माणूस' असणाऱ्या कोंडविलकरांना मात्र ते आपल्यात सामावून घेत नाहीत. अशा अनेक उदाहरणातून अस्वस्थता येते.

इतके असूनही ते प्रतिकारशून्यच वाटतात. फक्त बधिर होणं. केवळ तडजोड करून जगणं. उरात निखारा घेऊन राहणं खूप अवघड असतं. मुलं गुणोचांभार म्हणून खडे मारायची तेव्हा लेखक लिहितो, 'अगाखाली ओलं, ओलं लागायला लागलं. मांड्या भिजल्या ... उठलो तर लाज जाते, बसूनच राहिलो.' असे अनेक वर्षे हे शांत बसलेले लोक आहेत. पण हे सर्व विसरण्यासाठी त्यांनी स्वतःला लावून घेतलेली वाचनाची सवय खूपच महत्त्वाची आहे. एकदा शिक्षकाची नोकरी मिळाल्यानंतर, पगार व प्रपंच यात गुरफटून व शाळा हे दुय्यम काम मानणाऱ्यापैकी ते वाटत नाहीत. 'मी तळमळतोय; पण या गावात, माझ्या जन्मभूमीत माझ्या दुःखाशी समरस होणारा कोणी नाही' ही त्यांची खंत आहे.

विशेषतः बदली प्रकरण, त्यातही कोकणातील हा एक यक्ष प्रश्नच आहे. त्यासाठी त्यांना, पु. ल. देशपांडे, बाबा आढाव, मेश्रामसर यासारख्या माणसाकडे धावावं लागलं. पण सध्यापुरते हे त्यांचे शुक्लकाष्ट सुटल्यासारखे वाटते.

इतर शिक्षक, साहेब, छोटेमोठे पुढारी तर त्यांना भंडावून सोडतात. परंतु ज्या विद्यार्थ्यांना त्यांनी शिकवलं तो गोद्या त्यांच्यावर उलटतो. फक्त जात दुसरी म्हणून ! त्याने वहिनींना बोललेली वाक्ये तर मनाचा जळफळाट करतात. आजच्या कागदी शिक्षणाचा परिणामही त्यातून स्पष्ट व्हावा. 'त्यांना पांढरी म्हणून चिडवणे, पाणवठ्यावर घागर काढून दूर फेकणे, शिव्या देणे इ. प्रसंगांना एक स्त्री होऊन त्या तोंड देतात. जगतात. जगतानाच मरणप्राय यातना घेऊन जगणारी ही स्त्री क्रांतिपोषक मनोबळाची आहे, पण परिस्थितीपुढे त्यांना हात टेकावे लागतात. शरच्चंद्राच्या पार्वती, राजलक्ष्मी, माधवीप्रमाणे जीवनमूल्याशी त्या एकनिष्ठ राहतात. तडजोड करतात. खरे तर स्त्रीचा आदर सांगणाऱ्या समाजाचा हा घोर पराभव आहे.

दलितांना असलेल्या सवलती हा चर्चेचा विषय आहे. घडलेल्या घटिताची बातमी देताच एक शिक्षक म्हणतो, 'हल्ली सवलती मिळू लागल्यात त्याचा हा फायदा' पण प्रत्यक्षात या सवलतींची माहिती कितीजणांना आहे, हा प्रश्न आहे. आपल्याला सवलत मिळते हे माहीत नसलेले लोकही आहेत. पण हा सवलतीचा प्रश्न पुढे करून आपण फार दयावंत असल्याचा आरोप चुकीचाच आहे. पुढे साहेब म्हणतात— शिक्षकानी लिहायचं नसतं. पेपरात छापायचं नसतं.' इथं थक्क व्हायाला होतं. अस्वस्थता वाढते. अशा अनंत कटकटींनी सुन्न झालेला हा लेखक म्हणतो—'पुस्तकात जीव बरा रमतो; माणसापेक्षा ! एखादं नको वाटलं तर टाकता येतं: माणसाचं तसं नाही !' त्याच्या मनातील जिवंत माणसांविषयीचा उबग काय सुचवतो ?

घरातही पाळल्या जाणाऱ्या अनेक रूढी, परंपरा, विशेषतः चांभार समाजातील; त्यांनी तितक्याच समर्थपणे मांडल्या आहेत. पाचवी, लग्न, मयत काही असो दारू पिलीच पाहिजे. सुईण व इतर बायकांनासुद्धा त्यांची आई घोटभर दारू द्यायला सांगते यावरून ते स्पष्ट होते. डॉक्टर हा आदर्श असतो पण त्याच्या वाट्याला आलेले डॉक्टर काय दर्शवतात ? विज्ञानदृष्ट्या पुढारलेले म्हणून त्यांच्याकडं कसं पाहायचं ? या अस्वस्थ करणाऱ्या उदाहरणाबरोबरच—पाटाचं पाणी, कुटुंबनियोजनाचा लकडा, चहाचा कप कोपऱ्यात ठेवावा लागणे, बहिणीची दुःस्थिती, छळ इ. अनेक गोष्टीही येतातच. दुकानदाराच्या तोंडातील 'चांभारचुका' हा शब्द असाच बोचरा वाटतो. हे सर्व सोडून दूर जावं असं त्यांना वाटतं, पण ही पळवाट त्यांना मान्य नाही. ते म्हणतात—

'माझ्या काटल्या आहेत वाटा
उदरातच असताना आईच्या'

असेच एका राहत्या जागेचं वर्णन करताना ते लिहितात— 'पाऊस धुवाधार पडतोय. खोलीत सर्वत्र गळतंय. चुलीवर गळतंय. पुस्तकाच्या कपाटावर गळतंय. आता झोपायचं कुठं ? सालं सगळंच फाटलंय ! अशा एका विस्कटलेल्या जीवनाची ही कहाणी खोल हृदयस्पर्शी आहे. अस्वस्थ करणारी आहे. पुस्तकाच्या नावातील नवेपणा, सुभाष अवचटांचं योग्य चित्रदेखील मनावर परिणाम करून जाते. मात्र पु. ल. देशपांडे म्हणतात 'तुमच्या गावाला ज्याने कुणी देवाचे गोठणे म्हटले तो मूळ पुरुष चतुर असावा. जिथे साक्षात देवाचेदेखील 'गोठणे' झाले तिथे स्नेहभावनेने माणसाचे पाझरणे कसे शक्य आहे ?' असे अस्वस्थ बनवून वाचकांसमोर प्रश्न निर्माण करणारं हे पुस्तक स्वागतार्हच होय.

—मदन हजेरी

**मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे**
माधव कोंडविलकर
मॅजेस्टिक बुकस्टॉल
किंमत : २२ रु.

आवृत्ती संपत आली....

# जनांचा प्रवाह चालिला

लेखक :
विनय हर्डीकर
मूल्य :
वीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

फिनिक्स निवड

# In the Wonderland of Investment

A. N. Shanbhag
Jaico Publishing House,
Pages 219, Rs. 25.

सत्तरीत ( इंग्रजीमध्ये जसे Seventies म्हणतात तसे ) फिनिक्स लाट जोरात होती. त्यावेळेला लायब्ररीला होऊ नये तेवढा प्रॉफिट होत होता. कधी नव्हे तो प्रश्न उभा ठाकला. टॅक्समनची कुऱ्हाड कोसळणार नाही तिकडे हे पैसे कसे गुतवायचे ? आणि त्या वेळेला मी हे पुस्तक विकत घेतले. एकदा 'टाईम' साप्ताहिकात मी एका अमेरिकन वाचकाचे पत्र वाचले होते. दोन तीन ओळीचे ते असे–'I am more afraid of taxmen, lawyers and courts than I am afraid of the U. S. S. R.'

मला जर हेच पत्र लिहायचे झाले असते तर मी USSR ह्याऐवजी लायब्ररी बिझनेस हे शब्द घेतले असते, एवढच कारण ग्रंथालयाच्या धंद्यात मी इतके पैसे टाकले, इतकी मेहनत घेतली, व मला इतके रिटर्नस् मिळतील असे गणितच बसू शकत नाही. मी विद्यार्जन करीत आहे, म्हणून मला पुढल्या जन्मी तरी रिटर्न्स मिळतील अन्यथा निर्वाण तरी लाभेल, अशा आशेनेच रहाटगाडग चालवल पाहिजे.

एकदा Iceman Cometh या नाटकाविषयी कुठंतरी वाचल्याचे आठवते. ते बहुतेक युजीन ओनीलचे आहे. हे नाटक म्हणजे मृत्यूविषयीचे स्वप्न आहे असे या लेखात लिहिले होते. आता 'टाईम' हे साप्ताहिक इंग्रजी वाक्प्रचाराविषयी प्रख्यात आहे. ते इतके की एका ब्रिटिश लेखकाने ( Colin Wilson–आऊटसाइडर फेम ) या साप्ताहिकाच्या बकवासाबद्दल 'awe-inspiring vulgarity of 'Time' असे लिहिले होते. कॉलिन विल्सनने असे का लिहिले ? तर 'Time' ने या लेखकाचा उल्लेख 'Scrambled Egghead' असा केला होता ! सागायचे तात्पर्य असे की, टाईमने 'दि आइसमेन कमेथ' यावरून 'द टॅक्समन कमेथ' असे एका स्फुटलेखाला शीर्षक दिले होते. 'आइसमन कमेथ' मुळे जशी मृत्यूची Vision येते तशीच 'टॅक्समन' मुळे येते ! आता दरवर्षी ज्या साहित्यिकाना किंवा साहित्यप्रेमी जनाना IT रिटर्न भरण्याची वेळ येते तेव्हा जरूर 'The Taxman Cometh' असे पुटपुटावे. किंवा मला वाटते The Taxman Cometh with a hatchet असे म्हणणे अधिक उचित होईल.

जगात हुदीनी: लाल, सोरकार किंवा आर्थर मर्लिन यांच्यापेक्षा मोठा जादूगार कोण आहे ? काळा पैसा पाढरा व पाढरा पैसा काळा करणारा. टॅक्स कन्सल्टंट. इतक्या बेमालूमपणे कोणता जादूगार रंग बदलतो ?

आपण कधी कधी असे वाचतो की आयकर हा ९० ते ९५ टक्के पर्यंत चढतो. असल्या हायवे रॉबरीच्या सावजाबद्दल आपल्याला कळवळा येतो. सर्व आयकर कचेऱ्या गुडाळून ठेवल्या तर जगातील ९० ते ९५ टक्के पाप निश्चितच कमी होईल, बुद्धिवंत, प्रज्ञावंत, कलाकार, धाडसी व्यापारी वगैरेंचे पेव फुटेल, पती-पत्नीची भाडणे कमी होतील. कन्सल्टंटस जेरीस येतील. जगात सर्वत्र शांतता नादेल. कापकाच्या पात्राना एखादा फॉर्म भरायचा झाला की त्याला (non person) अव्यक्ती सारखे वाटते. सर्व IT अधिकाऱ्याना कापका वाचण्याचे सक्तीचे करावे म्हणजे फॉर्म भरण्याने किती बुद्धिमत्ता वाया जाते याची कल्पना त्याना येईल. कोर्ट, कचेऱ्या वकील वगैरे करून माणूस लवकर स्वर्गात जातो. याचेच पुण्य वकिलाना मिळत असेल!

एक–दोनदा तुम्हाला IT चा चटका बसला असेल तर हे पुस्तक तुम्हाला जरूर आवडेल. 'मी काय IT विभागासाठी येवढे श्रम घेतो काय ?' असा विचार केव्हाना केव्हा तुमच्या डोक्यात शिरला असेलच. असा विचार आला की, या पुस्तकाकडे वळा. एक दोनदा तुम्हाला IT नी लुबाडले असेल तर चिताग्रस्त होऊ नका. रस्त्यात इतक्या मोटारी फिरताहेत. मोठे मोठे बंगले बाधले जात आहेत. अधिकाधिक लोक परदेशी दौऱ्यावर जात आहेत. म्हणजे IT Department एवढे निर्दय नाही त्याची ही ग्वाहीच. IT चुकवू नका. टाळू नका. IT कडे इतक्या सवलती व सूट आहेत की, त्या आपल्या वाटचाला का येत नाहीत ही एक विचार करण्यासारखी बाब आहे. अर्थात आपण IT मधला सेक्शन अमका उघडून पाहिला की, हा अमका सेक्शन सब्जेक्ट टु किंवा रिलेटेड टु तमक्या सेक्शनलाच असतो आणि हा तमका सेक्शन इतर तिसऱ्याच सेक्शनला सब्जेक्ट टु असतो. आता हे सर्व वाचण्याचा प्रयत्न केला की, I am subject to vertigo किंवा काय असा संभ्रम पडतो व आपल्या पोटात जास्त प्रमाणात हायड्रोक्लोरिक ॲसिड निर्माण व्हायला लागते. तर आपला कन्सल्टंट चागला वगैरे असला तर असा व्हर्टिगो येऊ देऊ नका व सरळ त्याच्या सल्ल्याप्रमाणे वागा. पण कदाचित आपण आपला IT रीटर्न स्वतःच जर भरत असाल तर पुढे पुढे सब्जेक्ट टु, प्रोवायडेड हाऊएव्हरची सवय तुम्हाला होईल. ती इतकी की, रिटर्नच्या शेवटी तुमच्या सहीखाली तुम्ही नकळत कदाचित असा शेराही माराल 'subject to the light thrown in my head regarding IT rules !'

हे पुस्तक लिहायला श्री. ए. एन. शानभाग यांना प्रेरणा कशी मिळाली ? त्याना लहानपणी श्री. मिनू मसानीचे 'अवर इंडिया' हे पुस्तक इतके आवडले की, आपणही इतके उपयुक्त पुस्तक दुसऱ्या विषयावर लिहून लोकाचे कल्याण करावे असे त्यांना वाटले आणि म्हणूनच त्यानी हे पुस्तक मिनू मसानी यांना अर्पण केले आहे. श्री. शरु रागणेकर यानी 'इन द वंडरलँड ऑफ इंडियन मॅनेजर्स' हे पुस्तक लिहून एक पायंडा पाडला. एक ट्रेंड सेट केला. यानंतर पैसा या क्षेत्रात (म्हणजे मॅनेजमेंट, इनव्हेस्टमेंट वगैरे) 'सब्जेक्ट टु' चा दबाव कमी झाला. पैसा या क्षेत्राच्या पुस्तकात लेखक विनोद वापरू लागले. आतमध्ये विनोदी चित्रे छापून वाचकाचे लक्ष वेधू लागले. एका रुक्ष व कंटाळवाण्या विषयाला विनोदाची झालर बसली. या पुस्तकाचे नाव, शैली व आतली चित्रे सुद्धा रागणेकरी आहेत. Imitation is the best form of flattery, Mr. Rangnekar ! (खुद्द श्री. रागणेकरांनी पार्किन्सन्सारख्या पाश्चात्य लेखकाचे अनुकरण केले का हे

मला माहीत नाही.)

ज्यांना चक्रवाढ व्याज मिळवून झटपट श्रीमंत व्हायचे असेल त्यांच्यासाठी या पुस्तकात एक खास प्रकरण आहे. त्याशिवाय इन्कम टॅक्स, वेल्थ टॅक्स, गिफ्ट टॅक्स, इस्टेट ड्यूटी व श्री. निराद चौधरींना एक हिंदी वस्तू आवडेल ती IT ची H. U. F. (Hindu Undivided Family). या IT च्या H. U. F. वर मुस्लिम, ख्रिश्चनांची टीका आली होती. 'इक्वॉलिटी, इक्वॉलिटी असे तुम्ही म्हणता. ही कसली आली आहे इक्वॉलिटी ?' असे ते म्हणतात. चालायचंच. All men are equal. Some are more equal than others एवढंच. शिवाय मुस्लिमांना एकापेक्षा जास्त बायका असतातच की. झाले की मेक अप्. पण शेवटी मला वाटते की, कायदे सर्वांना सारखे असावेत. IT चे H. U. F. हे काढून टाकावे व तलाक, तलाक, तलाक यालाही बंदी असावी. व्होट कॅचिंगसाठीच जर चार बायकांना परवानगी असली तर मुस्लिमेतर जमातींही त्यांना एक-दोन बायका वाढवून दिल्या तर व्होट देतील.

LIC बद्दल तर इतके लिहिले आहे व इतक्या बारकाव्याने आकडे दाखवले आहेत की, आपल्याला वाटावे श्री. शानभाग हे LIC चे एजंटच आहेत की काय ?

त्याशिवाय इतर कॅल्क्युलेशन्स व टेबल्स इतकी आहेत की, त्यांचा आढावा घेता आपल्याला पुष्कळ वेळपर्यंत खुर्चीत बसून राहावे लागेल.

युनिट ट्रस्ट ऑफ इंडियाने पण लेखकाला थोडे कमिशन द्यावे. याचे कारण हे पुस्तक जे वाचतील ते निश्चितच युनिटस् घेतील. (म्हणजे ग्रंथालयेतर धंदेवाईक).

जास्त व्याजाचे अमीष दाखवून छोटया कंपन्या सामान्य माणसाकडून फिक्स्ड् डिपॉझिट घेतात. अशी गुतवणूक सर्वात धोकादायक आहे असे शानभाग म्हणतात. या विषयाला त्यांनी एक प्रकरणच वाहिले आहे. ते चक्क म्हणतात की, अशा तऱ्हेच्या गुंतवणुकीत व्याज तर बुडतेच, पण मुद्दलही परत मिळत नाही. काही अपरिहार्य कारणामुळे अशा प्रकारची गुंतवणूक करावीच लागली तर कन्सल्टंटच्या सल्ल्याने एका कंपनीत न ठेवता विखुरलेली ठेवा म्हणजे एखादी कंपनी बुडाली तर इतर ठिकाणी तुमची दुसरी गुंतवणूक शाबूत राहील. याबाबतीत सरकारने कंपन्याविरुद्ध कठोर कारवाई केली पाहिजे. महागाईच्या दिवसात आज दोन-तीन हजाराची बचत करणे हे काही सोपे नाही. आपण कितीतरी गोष्टींवर काटछाट करून पैसे वाचवतो. चैन तर राहोच, पण कित्येक आवडी निवडीवर आळा घालून हे लोक पैसे कंपन्यामध्ये ठेवतात.

मनुष्यस्वभावच असा आहे की जिथे ११२ टक्के जास्त व्याज मिळते तिथेच पैसे ठेवावे असे वाटते. याच विषयावर आमच्या ग्रंथालयात Personal Investment Planning हे एन्. जे. यशस्वीचेही पुस्तक आहे.

Do not put all your eggs in one basket या म्हणीचा अनुनय करणे हे उत्तम. थोडे शेअरमध्ये, थोडे LIC मध्ये, थोडे बँकेत फिक्स्ड डिपॉझिटमध्ये, थोडे सोन्याचांदीमध्ये तर थोडे रिअल इस्टेटमध्ये असा पूर्ण विचार करून आपली आयुष्याच्या बचतीची गुंतवणूक केली तर ती जरूर फायदेशीर पडेल. माझ्या मनात फक्त एवढाच विचार येतो की ४–५ रु. किलो कांद्याच्या दिवसात पैसे मागे टाकावे कसे ?

—जे. एन्. पोंडा

---

## नवीन दाखल झालेली पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १. | रंगविश्वातील रसयात्रा – (शेक्सपिअर जीवन व साहित्य)– के. रं. शिरवाडकर | रु. १२।– |
| २. | कपिल देव – (परिचय)–डॉ. वसन्त नाईक | रु. १२।– |
| ३. | विस्तारलेलं क्षितिज – (मराठी लेखिकांच्या निवडक कथा) संपादक–डॉ. हे. वि. इनामदार, आणि डॉ. सौ. अंजली सोमण | रु. २५।– |
| ४. | पिचकारी – ( राजकीय लेख ) – भाऊ पाध्ये | रु. १५।– |
| ५. | असामान्यांच्या खून कथा – प्रभाकर दिघे | रु. १८।– |
| ६. | राऊंड–अप – (गुन्हेगार कथा) – श्रीकात सिनकर | रु. १८।– |
| ७. | व्यक्ति आणि विचार – य. दि. फडके | रु. २२।– |
| ८. | कवितारती (कविता व कवी यावरील लेख) – विजया राजाध्यक्ष | रु. २५।– |
| ९. | तेथे लव्हाळे राहाती – (राजकीय कादंबरी) चिंतामणी लागू | रु. ३५।– |
| १०. | तीन महान सारस्वत – (चरित्रे) – धनंजय कीर | रु. १६।– |
| ११. | ज्वालामुखीच्या तोंडावर – (राजकीय) – कुमार केतकर | रु. २०।– |
| १२. | छंद माझे वेगळे – गो. नी. दांडेकर | रु. १२।– |
| १३. | भारत दोशी – स्मृतिग्रंथ – संपादक : अरविंद ताटके | रु. १५।– |

* **Which is the loveliest book ?**
**Not a Bank Pass – Book, mind !**
**But a Phoenix Book !!**

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**

# रंगभूमी

विनया खडपेकर

# मंतरलेली चैत्रवेल

## लेखनात चांगले, प्रयोगात उत्तम

घिगोवा हिंदु असोसिएशनच्या श्री. सुरेश खरे लिखित आणि श्री. अशोक साठे दिग्दर्शित 'मंतरलेली चैत्रवेल' या नाटकाचा आठवा प्रयोग विलेपार्ले येथील दीनानाथ मंगेशकर नाटचगृहात झाला.

सेवानिवृत्त कर्नल श्री. राजे, त्यांची कन्या चारू आणि घरव्यवस्था पाहणारी एक स्त्री लीलाबाई हे तिघे एका बंगल्यात राहतात. चारू कायम आजारी असते. तिला अधूनमधून वेडाचे झटके येतात. तिचे लग्न होणे शक्य नाही. तेव्हा तिला पुरुष सहवास मिळवून देण्यासाठी कर्नल एक पी. ए. पाहिजे अशी जाहिरात देतात. प्रदीप नोकरीसाठी मुलाखतीला म्हणून येतो. पण काम कोणते ते कर्नलांकडून स्पष्ट कळल्यावर ती नोकरी न करण्याचेच ठरवतो. पण त्याची प्रेयसी सुमित्राच त्याला या नोकरीसाठी प्रोत्साहन देते. तो एक मानसशास्त्राचा अभ्यासक असतो. आव्हान म्हणून मग ती नोकरी स्वीकारतो. चारूच्या आजाराची कारणे शोधतो. तिला बरी करतो. पुढे तिच्यात गुंतू लागतो. तिला टाळतो. सुमित्रा, प्रदीप आणि चारू यांनी लग्न करावे असे दुःखाने पण आग्रहाने सांगते. पण चारू तसे करीत नाही. खंबीरपणे एकटीच उभी राहीन असे ठरवते.

अशा प्रकारचे कथानक आपण अनेक कथा-कादंबऱ्यात वाचलेले असते किंवा काही चित्रपटातूनही पाहिले आहे. विषयात नाविण्य नाही. तरीही तीन तास प्रेक्षक गुंगून जातात. नाटकाबरोबर वहात जातात. याचे कथानक सुसंबद्ध आहे. ते निरनिराळ्या संवादातून गतीने पुढे नेले आहे. कोठेही अनावश्यक संवाद घालून रटाळ केले नाही. लीलाबाईची कथा, चारूच्या जन्माची हकीगत याचे रहस्य अधून-मधून खेळते ठेवले आहे. नाटकातील पात्रांचे स्वभावदर्शन बरेच स्पष्ट आणि सूक्ष्म आहे. कर्नल राजे एक उदार मनाचे, शिस्तीचे आणि स्पष्टवक्ते गृहस्थ आहेत. लीलाबाई ही सूडाने पेटलेली स्त्री आहे. चारू या दोघांच्या मध्ये सापडलेली एक कोवळ्या वयाची, कलाप्रेमी, अगतिक पोर आहे. प्रदीप उत्कट मनोवृत्तीचा, हुषार अभ्यासक आहे. सुमित्रा एक सुजाण स्त्री आहे. इतकी स्पष्ट व्यक्ती-चित्रे हल्ली नाटकात क्वचितच आढळतात. ही व्यक्तीचित्रे ही या नाटकाची मोठीच जमेची बाजू. 'लोखंडे' या पात्राची मात्र नाटकात काहीच आवश्यकता वाटत नाही. केवळ विनोदासाठी हे पात्र राबविले आहे. मधेच त्याचे चारूवर मन गेले आहे असा भास निर्माण करून प्रेक्षकांना चकविले आहे. बाकी या कथानकात दोष नाही.

नाटकाचा प्रयोग उत्कृष्ट होतो. एका सेवानिवृत्त कर्नलच्या बंगल्याचे दृश्य योग्य सजविले आहे. सर्वच कलाकार (श्री. दत्ता भट) शांता जोग (लीलाबाई) दया डोंगरे (सुमित्रा) शशिकांत शिर्सेकर (लोखंडे) मीनल जोशी (चारू) आपापल्या भूमिका उचित भानाने करतात. श्री. जयराम हर्डी-कर (प्रदीप) यांच्या अभिनयाचा विशेष उल्लेख करायला हवा. सामान्य परिस्थितीत पण तडफदार, संवेदनाक्षम तरीही हळवा नसलेला, विचारी, अभ्यासू 'प्रदीप' उभा करणे हे एक आव्हान होते. श्री. जयराम हर्डीकरांनी ते सहज पेलले आहे. प्रदीप सुरुवातीला काहीशा सुमित्राच्या आग्रहाने, काहीसे एक आव्हान म्हणून आणि काही अंशी चारूची कणव येऊन ती नोकरी स्वीकारतो. तो चारूमध्ये गुंतू लागतो तरी त्याचे सुमित्राचे प्रेम कमी होत नाही. भाव-नांच्या या निरनिराळ्या छटा दाखविणे श्री. जयराम हर्डीकर यांना सहज जमले आहे. काही न बोलता त्यांचे केवळ खुर्चीत बसणेही चारूमुळे होणारे त्याचे हरवलेपण प्रेक्षकांना सांगून जाते. 'टक्कल पडलेली सुंदरी' सारख्या पोकळ नाटकातही जयराम हर्डीकर यांचे अभिनय सामर्थ्य जाणवले होते. त्या-नंतर त्यांची 'आरोप' आणि 'अशा या दोघी' मधील त्यांच्या भूमिका ठीक वाटल्या तरी विशेष आकर्षून घेणाऱ्या वाटल्या नाहीत. 'मंतरलेली चैत्रवेल' मधली त्यांची ही भूमिका मात्र त्यांच्या श्रेष्ठ कलादर्जाची

साक्ष देणारी आहे.

लेखनात चांगले आणि प्रयोगात उत्तम असे हे प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे नाटक आहे. *

# ऑन्टी

## प्रयोगात (च) ठीक

प्रत्येक जमान्याची एकेक प्रवृत्ती असते. एकेकाळी स्त्री शिक्षण, स्त्रीसुधारणा, हा विषय जिकडे तिकडे चर्चिला जात होता. कथा, कादंबऱ्या, नाटके जाता येता या विषयावर मतप्रदर्शन करीत. एकंदरीत तो विषय समाजाच्या कुतुहलाचा विषय होता. चालू जमान्याचीही एक प्रवृत्ती आहे. समाजातल्या अशिक्षित, असंस्कृत समजल्या जाणाऱ्या खालच्या थराचा शोध घेण्याची यामुळेच कथा, कादंबऱ्या, नाटके या सर्वच ठिकाणी ' झोपडपट्टी ' ' मवाल्याचे जग ' हा विषय आघाडीवर दिसतो फार क्वचित या विषयाचा खोल वेध घेतलेला आढळतो. बहुतेक वेळी या विषयाची लाट आहे. म्हणून तो वापरलेला असतो. शिवाय या विषयाच्या अनुषगाने ' सेक्सी ' प्रसंग दाखविण्याचीही संधी मिळून गर्दी खेचता येते. कोणत्याही कारणाने का असेना सध्या रंगभूमीवर झोपडपट्टीची चलती आहे.

' ऑन्टी ' या श्री. रमाकात कवठेकर लिखित नाटकातही अशाच कोणत्या तरी वस्तीतला दारूचा गुत्ता आहे. साबीन ऊर्फ आन्टी हिचा एक दारूचा गुत्ता. तिची मुलगी मारी. साबीन वासनेने वखवखलेली. तिला शय्यासोबतीला रोज नवतवे तरुण लागतात. कामधंदा नसलेल्या शामला ती गुत्त्यात कामाला म्हणून आणते. ऑन्टीचे व्यसन मारी शामला सांगते. शाम पळून जातो. पण ऑन्टी त्याला परत आणून जबरीने त्याच्याशी लगट करते. ऑन्टीचा प्रियकर करीमदादा जामिनावर सुटून तुरुंगातून येतो तो शामवर तुटून पडतो. शामचा दोष नाही या मारीच्या सांगण्यामुळे शामची सुटका होते. पण ऑन्टीवर सूड म्हणून दादा मारीलाच घेऊन जातो. ऑन्टी हादरते. रोग झाल्यामुळे ऑन्टीने तोडून टाकलेला तिचा पूर्वीचा प्रियकर म्हणजे मारीचा बाप त्याला आता ऑन्टी जवळ करते. मारीला सोडविण्यासाठी त्याला पैसे देते पण मारी मिळत नाही. एके दिवशी करीम येतो. मारीशी शादी करणार असल्याचे सागतो. शाम त्याचा खून करतो. नटलेली मारी येते. करीमने त्याची चेष्टा केल्याचे आणि तिचे तिच्या प्रियकराशी फिलीपशी लग्न योजल्याचे सांगते. पोलिस आल्यावर ऑन्टी स्वत वर खुनाचा आरोप घेते. पोलीस सगळ्यांना पकडून नेतात.

असे हे थोडक्यात कथानक – त्यात अनेक दोष आहेत. गुत्त्यात कोणकोणते लोक येतात ते दाखविले जाते. त्यात शाळामास्तर आहे. गल्लीचा दादा आहे. नट, नाटककार, नाटकनिर्माता आहे. कथानकाशी या लोकाच्या येण्याजाण्याचा काहीच संबंध नाही. त्यामुळे लोकाचे येणेजाणे हा गुत्त्याचा कोरडा तपशील वाटतो, आपला धंदा ' रात्रीचा ' असे ऑन्टी मारीला पुनः पुन्हा म्हणते. त्यात वेश्याव्यवसायाने सूचित होते. पण मारीच्या बोलण्यावरून ती हा धंदा करीत नाही. असे आढळते. ऑन्टी स्वतःची वासना भागवण्यासाठी कोणाला तरी जाळ्यात पकडण्याच्या सदैव धडपडीत असते. याचे आश्चर्य वाटते. तिचा उल्लेख म्हातारी असा असला तरी रंगभूमीवर तिचे दिसणारे रूप कुणी गिऱ्हाईक न मिळण्याइतके म्हातारे वाटत नाही एवढे दोष वजा केले तर ढोबळमानाने कथानक ठीक आहे.

या नाटकाची जमेची बाजू या या नाटकात काय नाही हे सागून द्यावी लागेल. दारू पिण्याची दृश्ये, दारुड्याच्या गप्पा यांना फार वेळ दिला नाही. ती आवश्यक तेवढ्या वेळात आवरली आहेत. मध्यमवर्गीयाना लाथा घालून, मजूर किंवा पिळल्या जाणाऱ्या वर्गाची अवस्था सांगणारी भाषणबाजी या नाटकात नाही. सर्व नाटकांमध्ये मद्यपानदृश्ये, भोषणबाजी बोकाळली आहे. म्हणूनच येथे ती नाही याचे कौतुक वाटते.

नाटक दोन अंकात आणि मुख्य म्हणजे केवळ दोन तासात आवरले हे फार बरे झाले. त्यामुळे ते कंटाळवाणे झाले नाही. एरवी लेखकाजवळ काही सांगण्यासारखे नसताना उगीचच तीन तास किंवा त्याहीपेक्षा अधिक वेळापर्यंत नाटक ताणले जाते आणि कमालीचा कंटाळा येतो. येथे लेखकाजवळ सागण्यासारखे आहे तेवढाच आटोपशीर पसारा मांडून नाटक संपविले आहे.

नाटकाचा प्रयोग एकंदरीने ठीक होतो. दारूच्या गुत्त्याचे एका गोवेकर बाईच्या घराचे वातावरण योग्य रितीने दाखविले. स्त्री देहप्रदर्शनाच्या बाबतीत नाटके आता चित्रपटाशी स्पर्धा करू लागले आहेत हे यातील स्त्रियांचा पोषाख पाहून जाणवते.

श्री. केशवराव मोरे यानी दिग्दर्शित केलेल्या नाटकात आशू (ऑन्टी), मोहन कोठीवान (करीमदादा), रविकात तुळसकर (अंकल), रणीत मसुरेकर (शाम), राजन महाडीक (फिलीप), प्रकाश फडतरे (प्रोड्यूसर), अनील दिवेकर (नट). सीताकांत अडफडकर (लेखक), विनायक करंबेळकर (आंधळा), जयंत मुजुमदार (भिकारी), संजीवनी बिडकर (मारी), नंदु लबडे या कलाकारांनी आपल्या भूमिका योग्य प्रकारे सांभाळल्या आहेत. श्री. मोहन कोठीवान याचा अभिनय विशेष उल्लेखनीय वाटतो.

करण्याचे काहीच कारण नाही. ( आपण वाचक जर अध्यात्मादीवरील साहित्य वाचत असाल तर ते विवेचन आपणास नक्कीच शास्त्रशुद्ध वाटेल. उदा. 'योगसिद्धी मासिकातील पुनर्जन्माचा लेख ) मानसशास्त्राच्या दृष्टीने मन.शाती फार महत्त्वाची आहे. त्यामुळे या विषयावरील टीका संयुक्तिक वाटली नाही. उदा. अमेरिका या राष्ट्रात ( सर्व सुखे असतानाही ) पूर्वी शंभरात दोन वेडे लोक आढळत व आज शंभरात चार आढळतात. याचे कारण काय? तसेच माणसाने जगायचे कशासाठी ? या प्रश्नाचे उत्तर (जर असेल तर) ते केवळ भारतीय तत्त्वज्ञानच देऊ शकेल असे काही अमेरिकन संशोधकाना वाटते. ( हे मत माझे नसून प्रा. शिवाजीराव भोसले यांचे येथील व्याख्यानातील आहे.)

यज्ञसंस्था याबद्दलचा डॉ. शरद अभ्यंकर याचा विचार योग्य वाटतो. म्हणजे यज्ञात पैसे घालवण्यापेक्षा त्यांचा वापर लोककल्याणार्थ करणे होय. भारतासारख्या गरीब देशाचा मला वाटते की, उपग्रह आदीवर जो खर्च होतो, त्यामुळे कोणते ज्ञान मिळते ? आणि मिळत जरी असले तरी लक्षावधी लोकाना अर्धपोटी ठेवून या गमजा करण्यात काय अर्थ ? अमेरिका तिकडे खर्च करेल कारण तेथील लोक सुखसंपन्न आहेत. गोवधबंदीचे स्तोम भारतात माजवू नये.

ज्योतिष हे पूर्वी एक चागले शास्त्र असावे व दुर्लक्षिले गेल्यामुळे त्याची अधोगती झाली असावी व त्यामुळे त्याचे अदाज चुकत असावेत असे मला वाटते. तथापि त्यावर विश्वास ठेवणे सर्वस्वी चूक होय.

मुहूर्त, वास्तुशात हे आपण केवळ मानसिक समाधानासाठी करीत असतो. ज्याला आवश्यक वाटेल त्याने करावे व अनावश्यक वाटेल त्याने सोडून द्यावे. काही वेळा जेव्हा सर्व मानवी उपाय एखाद्या गोष्टीपुढे तोकडे पडतात तेव्हाच मनुष्य दैववादाकडे वळतो. तेथे फक्त त्याची समजूत असते की, काहीतरी चांगले होईल म्हणून. पण तसे कधी होत नाही.

आत्मा आहे किंवा नाही याचे उत्तर असे आपण 'होय' असे देऊ शकत नाही तसेच 'नाही' असेही देऊ शकत नाही. उदा. एखाद्यावर खोटा आळ येऊन अनेकानी त्याच्याविरुद्ध साक्ष दिली तर तो दोषी ठरतो. परंतु तो दोषी नसतो. तसेच आत्मा असेल किंवा नसेल त्याबद्दल विचार करायचे काहीच कारण नाही ( आणि समजा एखाद्याने विश्वास ठेवला तरी त्याचा दुष्परिणाम होत नाही.) श्राद्धादी कर्मावर विश्वास ठेवू नये. तथापि आपण तिरडीऐवजी उपाय सागितला तो खेड्यात कुचकामी आहे. विद्युद्दाहिनी तर फक्त काही शहरातच आहे. तिरडीस अघोरी समजण्याचे काहीच कारण नाही.

भारतीय जनतेने भूतबाधा, कडकलक्ष्मी; अघोरी कृत्ये, बगाड, मात्रिक चेटूक इ. वर बिलकुल विश्वास ठेवू नये व वृत्तपत्रानी ( नियतकालिकानी ) त्याचा प्रचार करू नये.

भारतातील काही समजुती वेडगळ, अंधश्रद्धामूलक आहे हे मी कबूल करतो. तथापि विज्ञाननिष्ठा किती असावी याबद्दल माझे विचार पुढीलप्रमाणे– *विज्ञानाने जे केले ते* सर्व उपकारकच केले असे म्हणता येणार नाही. अणुबॉम्ब म्हणजे एक फुगविलेला फुगा आहे. टाचणी लागताच फुटणारच. त्यामुळे *शातीचा कितीही जयघोष केला तरी प्रत्येक* राष्ट्र त्याप्रमाणे वागेलच याविषयी ग्वाही देता येत नाही. विज्ञान युगात फार यंत्रे निर्माण झाली. आता कॉम्प्यूटर कृत्रिम मानव इ. निर्माण करतात. अशी जर जास्तच यंत्रे निर्माण होत गेली तर 'मानव 'नामक यंत्राचे काय करायचे हा प्रश्न उद्भवेल. तसेच विज्ञानाने निर्माण केलेले प्रदूषणवादी 'खतरनाक' प्रश्न आहेतच. पाश्चात्य लैंगिक स्वातंत्र्यही काही फार चागली कल्पना नव्हे!

हजारो वर्षापूर्वीचे हिंदू तत्त्वज्ञान-ह्यातील काही भाग सोडण्यासारखा असला तरी काही विचार चागले असणारच !

तात्पर्य, विज्ञान व तत्त्वज्ञान यांचा सुवर्णमध्य काढून त्याप्रमाणे वागायला हवे. एकाविषयी आंधळा अभिमान व दुसऱ्याविषयी द्वेष हा अविचारच आहे.

२२ जाने. ८० **प्रभाकर रघुनाथ देशपांडे**
**नाशिक**

□ 'माणूस'च्या दि. १९।१।१९८० च्या अंकात डॉ. शरद अभ्यंकरांचा लेख वाचल्यानंतर त्याची तळमळ, पांडित्य, बुद्धिवादी विचारसरणी आणि त्याच्या सखोल अभ्यासानुसार त्याच्या लक्षात आलेल्या भ्रामक समजुती आणि रुढी यांचा नायनाट करण्यासाठी त्यानी आणि त्यांच्यासारख्याच इतरानी केलेले प्रयत्न आणि त्याला आलेले अपयश, त्यामुळे आलेला *वैताग* सहज कळू शकला. त्या लेखावर संपूर्ण प्रतिक्रिया देणे शक्य नसले तरी काही थोडे विचार व काही प्रश्न मनात आले ते लिहून पाठवीत आहे.

१ : *अभ्यकराची* भूमिका निश्चित कोणती ? निखळ बुद्धीवाद्याची, रॅशनॅलिस्टची की हिंदू धर्म सुधारकाची ? रॅशनॅलिस्टची असेल तर निर्बुद्ध–किंवा बुद्धिवादविरुद्ध *असलेल्या रूढी आणि* वर्तणूक यावर प्रहार करण्यासाठी त्यानी ज्या गोष्टी निवडल्या त्यात बुरखा आणि अनुषंगाने आलेल्या पडदा पद्धतीपासून तर तास न् तास कॉफी हाउसमध्ये बसून कॉफीचे अनेक

कप ढोसत, सिगारेटच्या पाकीटाचा फडशा उडवीत (ही वागणुकही पूर्णपणे बुद्धीशी वैर करणारीच) तात्त्विक चर्चा करणाऱ्या तथाकथित बुद्धिवाद्यांच्या भंपकपणाविरुद्ध काही केले आहे की नाही हे स्पष्ट झाले पाहिजे. हे यासाठी की, त्यामुळे त्यांच्या भूमिकेतील प्रामाणिकपणा त्यांना जाणवेल.


जर हिंदूधर्मसुधारकाची त्यांची भूमिका असेल तर त्यांचे रूढीवरील आसूड गाडगे-महाराजांप्रमाणेच सामान्य जनता प्रेमाने सहन करील, समजून घेईल. पण त्यासाठी रूढींच्या विध्वंसासोबत ज्या मूळ हेतूंनी ह्या रूढी निर्माण झाल्या असतील किंवा जे उद्देश त्यातून पूर्ण होत असतील त्यासाठी नव्या विधायक (केवळ विध्वंसक नव्हे) कार्यक्रमाला (श्री. बाबा आमटे यांच्या-प्रमाणे) समाजापुढे त्यांनी ठेवले आहे काय ?

(स्वतःच्या कृती आणि वर्तणूक यांच्या आदर्शातूनच स्वतःच्या भूमिकेचे इमान लोकांना पटवावे लागते. तसे ते पटल्या-शिवाय लोक कुणाला स्वीकारीत नाहीत. पोकळ पांडित्यापेक्षा साध्या सात्त्विक संत-वाणीमागे समाज जातो याचे कारण हेच संतांविषयीचे हे प्रचंड आकर्षणच भोंदु बुवांना 'मार्केट' मिळवून देते, इमिटेशन खड्यांप्रमाणेच !)

२ : गणेशविषयक कल्पनाचे मूळ व त्यातील स्थित्यंतरे व उत्क्रांती यावरील प्रदर्शनात, या देवतेचा जागतिक संचार, लोकप्रियता आणि (ॐ) ओंकार संकल्पनेत त्याची झालेली परिणती किंवा त्या संकल्प-नेची त्याची घातलेली सांगड याविषयीचा भागही त्या उधळलेल्या प्रदर्शनात होता का ? नसेल तर प्रदर्शनाची भूमिका निव्वळ विध्वंसकांचीच ठरते. त्यामुळे अशा प्रदर्श-नाही कुणी विध्वंस केला तर त्यात अतार्किक असे काहीच नाही. हा विध्वंस कोणी कोणत्या पद्धती वापरून करायचा हा ज्याच्या त्याच्या सोयीचा प्रश्न नाही का ?

३ : 'विशुद्ध शंका हिंदू तत्त्वज्ञानात कधी घेतली जात नसते. स्वीकृती, नकार किंवा तटस्थता ह्या तीनच भूमिका आहेत.' इत्यादी विधान वाचून मी थक्क झालो. बुद्धिवाद्याने पूर्ण अभ्यासाशिवाय विधाने केली की, बुद्धिवाद बदनाम होतो याची जाणीवही डॉ. अभ्यंकरांना असू नये ही खेदाची गोष्ट आहे.

वाद, जल्प, आणि वितंड ह्या वादांच्या तीन प्रकारांपैकी वादात पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष होऊन तात्त्विक सिद्धान्तावरील चर्चा ही प्रथम विशुद्ध शंका घेऊनच सुरू केली जाते. काही बाबतीत ही शंका उपस्थित करता येत नसेल तर Hypothetfical

**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**

**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**

**या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....**

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

**लेखक : वि. ग. कानिटकर**

**आवृत्ती : तिसरी (सचित्र)**

**किंमत : रुपये पंचेचाळीस**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

Doubt उपस्थित करायचा असतो. संपूर्ण हिंदू तत्त्वज्ञान 'हे सत्य आहे काय ?' 'कशावरून ?' 'नसेल तर सत्य काय ?' या प्रश्नाच्या अनुरोधानेच निर्माण झालेले आहे याविषयीचे निखळ अज्ञान या लेखात अपेक्षित नव्हते.

४ : शास्त्रीय प्रदर्शन सुरू ठेवू दिले नाही म्हणून डॉ. भार्गव यांनी विदेशात प्रधान-मंत्र्यांची निंदानालस्ती करण्याचा प्रकार शिवाम्बू प्राशनापेक्षाही घृणास्पद आणि नीच आहे याची जाणीवही डॉ. अभ्यंकरांना असू नये काय ? अशी घृणास्पद निंदा करणाऱ्या डॉ. भार्गवांविषयी 'काय बेअक्कल आणि नालायक माणूस आहे' असाच समज त्या विदेशियाचा झाल्याशिवाय राहिला नसेल.

५ : शिवलिंग पूजेसंबंधीची पाश्चात्त्य उपपत्ती गृहीत धरून डॉ. अभ्यंकर थेट सखाराम बाईंडरच्या पातळीवर उतरले आहेत. पण माझ्या आठवणीप्रमाणे स्वामी विवेकानंदांनी पॅरिसच्या धर्मेतिहास परिषदेत ही उपपत्ती खोडून काढणारा निबंध वाचला होता. तशा दोन उपपत्तींचा त्यांनी उल्लेख केला आहे. १) ऋग्वेदातील 'यूपस्कंभ' आणि २) बौद्ध स्तूपाच्या प्रतिकृती मंजुषेच्या रूपात घरोघर पूजिल्या जात होत्या त्याचेच हे हिंदूकरण. एक मात्र निश्चित सांगता येते की, लोक-भाषेतील जो अर्थ त्याला चिकटला आहे तो मूळ अर्थ नाही सूक्ष्म शरीर ( Astral Body ) म्हणजे लिंगशरीर आणि योनी म्हणजे जाती ( species ) जसे, पशुयोनी, वृक्षयोनी, पक्षीयोनी, मार्जारयोनी इ. शास्त्रीय मीमांसा करताना शिविगाळीवर उतरू नये याचे भान डॉक्टर महोदयांना राहिलेले नाही.

६ : पशुहत्येविषयी गाडगे महाराजांप्रमाणे डॉ. अभ्यंकरांचा आक्षेप आहे की, 'जिव्हा-लौल्यासाठी ती हवी तितकी करायला हरकत नाही. परंतु ईश्वरार्पण करून प्रसाद या नात्याने मांसान्न घेण्यावर त्यांचा आक्षेप आहे,' हे स्पष्ट झालेले नाही.

७ : हिंदू धर्माविषयी तिरस्कार व्यक्त करणारे विधान करताना त्याच्या समर्थनार्थ ज्या प्रथाची लांबलचक यादी दिलेली आहे ती टीका समाजाच्या खुळचा वाटणाऱ्या वर्तणुकीवर आहे. ती टीका उपनिषदे, वेद व गीता यासारख्या धर्मग्रंथाच्या त्रुटी वगैरेवर असती तर सुसंगत ठरली असती.

सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरसांना समाजसेवेच्या ज्या सूचना डॉ. अभ्यंकरानी केलेल्या आहेत त्याचे फार कौतुक वाटले. डॉ. अभ्यंकरही समाजसेवेसाठी राबत असले पाहिजेत याविषयी खात्री पटली. त्यामुळे त्यांनी कमीत कमी स्वत:च्या कुटुंबियाचे साह्य घेऊन त्यांच्याच आवडत्या कार्यासाठी पुढील महत्त्वाची कामे करण्यात आयुष्य घालवावे असे विनम्रपणे सुचवावेसे वाटते. ( वास्तविक मला शक्य झाले असते तर मीच ही कामे केली असती. पण त्यासाठी वेळ आणि सामर्थ्य नसल्यामुळे डॉ. अभ्यंकरानी काय करावे हे सुचविणेच मला शक्य आहे ! )

१ : वाई आणि त्याच्या आसपासच्या प्रत्येक खेड्यात शववाहिका आणि विद्युत-दाहिनीची व्यवस्था करायला नगरपालिका आणि ग्रामपंचायतीना डॉ. अभ्यंकरांनी भाग पाडावे.

२ : प्रेते गाडल्याने अधिकाधिक जमिनीचे स्मशान होते. ती प्रथा रद्द करवून ही संपूर्ण जमीन शेतीखाली आणण्याचा त्यानी प्रयत्न करावा.

त्याना या सूचना आवडल्या तर आणखी नवीनवी कार्यक्षेत्रे त्याच्यासाठी सुचवू शकेन.

**विनायक शिवाजी शेणवाई**

२१ जानेवारी ८० नागपूर

□ 'माणूस' च्या दि. १९ च्या अंकातील विजय कुवळेकरांचा 'आढावा' बराचसा वस्तुस्थितीनिदर्शक वाटला. पण सातव्या


मोठमोठ्यांना जे साधत नाही व साधलेले नाहीं ते येथे एका शाळाकॉलेजात न गेलेल्या स्त्रीने सहजगत्या साधले आहे... —प्रा. वा. ल. कुलकर्णी (प्रास्ताविकातून)

## सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची, सर्वसामान्य वाचकांची दाद लाभलेले हंसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र.

तिसरी आवृत्ती । किंमत : बारा रुपये


**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

लोकसभेतील विरोधी पक्षाच्या स्थितीवर लेखकाने अधिक प्रकाश टाकायला हवा होता. विशेषत: जनता पक्ष फुटीनंतर २०५ खासदार राहिलेल्या मूळ पक्षाचा पाला-पाचोळा इंदिरा झंझावातात कुठल्याकुठे उडाला. त्यांना ३१ च जागा मिळून चौथे स्थान प्राप्त झाले. त्यामानाने देशभर पक्ष-बदलू-गद्दार म्हणून संभावना केलेल्या लोकदलाला मात्र ४२ जागा मिळून तो दुसऱ्या क्रमाकाचा पक्ष ठरला. उ. भारतात त्यानीच (इं.) काँग्रेसला चांगली लढत दिली असे का घडले यावर लेखात अधिक टीका-टिपणी करणे आवश्यक होते.

राजनारायणचे विदूषकी चाळे, लिमये यांची विध्वंसक वृत्ती व चरणसिंगाची अति-महत्त्वाकाक्षा ही फुटीची फार वरवरची कारणे झाली. माझ्या मते 'जनता'तील परस्परविरुद्ध अंत.प्रवृत्ती, त्यामागे असणारा सामाजिक संघर्ष, सोन्याची अंडी देणारी कोबडी सगळीच गिळंकृत करण्याचा संघ-जनसंघाचा डाव, त्यातून चरणसिंग गटाला पक्षाबाहेर हुसकावून लावण्याचे शिजलेले कटकारस्थान आणि मोरारजीची आत्मकेंद्रित वृत्ती ही फुटीची खरी कारणे होत. इंदिराजीच्या एकतंत्री एकाधिकार-शाहीला शह देण्यासाठी जनसघ – भालोद वगैरे परस्परविरुद्ध शक्ती 'जनता'त एकत्र आल्या नंतर त्यानी एकमेकाचे पाय ओढले-तरीही गळ्यात गळे घालावे हा भाबडा आशावाद झाला. आता जनता – लोकदल, यांचे मर्यादित प्रमाणावर सहकार्य होऊ शकेल पण विलिनीकरणाचे प्रयत्न फलदायी होणार नाहीत.

या निवडणुकीत एक गोष्ट सिद्ध झाली की, चरणसिंग गटाला 'जनता'तील कुठल्याही इतर गटापेक्षा अधिक 'मास बेस' आहे. उ. प्रदेशातील १८ राखीव जागापैकी १० जागा व ग्रामीण भागात लोकदलाचे हिंदु-मुस्लिम उमेदार निवडून आले आहेत. मूळ 'जनता'त जनसंघ गटाचे ९३ खासदार होते. त्यांची संख्या १६ पर्यंत घसरली आहे. एका अर्थाने त्यांची ही जबरदस्त पीछेहाटच म्हणावी लागेल, राजस्थान-मध्यप्रदेश-हिमाचल-पंजाब यापैकी एकही बालेकिल्ला ते वाचवू शकले नाहीत. नवी दिल्लीसारख्या ठिकाणी अटलबिहारीचा फक्त ४ हजारांनी विजय धक्कादायकच आहे! सर्व संघटना गिळंकृत करण्याचे राजकारण त्यांच्या चागल्याच अंगाशी आले प्रथम जनता पक्ष फुटला, नंतर मित्रपक्षांनी साथ सोडल्यामुळे सरकार कोसळले आणि आता त्यांची स्वत:-चीच ताकद खच्ची झाली आहे बदलत्या परिस्थितीत संघ-जनसंघ याचे संबंध एक-मेकांना पूरक नसून विघातक आहेत, इतकेच नव्हे तर आत्मघाताचेच आहेत, हे त्यांनी वेळीच ओळखावे. जनसामान्यांना आकृष्ट करणारे व त्यांच्या भल्याचे कार्यक्रम त्यांनी हाती घेणे आवश्यक आहे. प्रखर राष्ट्रनिष्ठा व समर्पित वृत्तीच्या कार्यकर्त्यांचा ताफा एवढेच पुरेसे नाही.

२५ जानेवारी ८० व्यंकटेश पु. एकबोटे
ठाणे,

लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी
१९४८-४९

**लेखक : पु. ल. इनामदार । मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

हिंदी चित्रपट । सदानंद बोरसे

# साहिबबहादुर

'नौकर'च्या वेळी विचारलेल्या प्रश्नासारखाच एक प्रश्न 'साहिबबहादुर'च्या वेळी विचारावा लागतोय, यावेळी उत्तर मात्र निराळे आहे.

तुम्हाला देव आनंद आवडतो का ?

नाही ! मग तुम्ही साहिबबहादुर पाहणार नाहीच.

हो. तर मग ते आवडतेपण कायम ठेवायचे असेल; तर साहिबबहादुर पाहणे सोडाच, तो ज्या ज्या ठिकाणी दाखवला जातोय, त्या पंचक्रोशीत फिरकू नका. त्याऐवजी या मॅटिनी आयडॉलचा एखादा 'हम दोनों' पुन्हा तेविसाव्यांदा वा एखादा 'पेईंग गेस्ट' पुन्हा चौतिसव्यांदा पाहणे अधिक चांगले.

निकोलाय गोगोलच्या 'The Government Inspector' या कृतीवरून त्या विदेशी इन्स्पेक्टरच्या पेहरावात देशी (आणि धंद्याच्या दृष्टीने अनुकूल असे) बदल घडवून चेतन आनंदने 'साहिबबहादुर' पेश केला आहे. हिमालयाच्या कुशीत (हिमाचल प्रदेशात ?) वसलेले एक छोटेसे गाव. या गावातील सगळेच सरकारी अधिकारी चोर, लाचखाऊ, भ्रष्टाचारी. त्यात या गावात स्मगलिंग, डाकूगिरी वगैरेही जोरात चालू, अर्थातच या अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने. एक दिवस या सगळ्या महाभागांना खबर मिळते,–आपल्या चौकशीसाठी एक अधिकारी येत आहे आणि तो गुप्तपणे येत आहे, शिवाय तो अतिशय हरहुन्नरी असल्याने कोणाचेही–गायक, नर्तक, आचारी किंवा कोणीही–सोंग घेऊन येतो. हे कळल्यानंतर साऱ्यांचीच पाचावर धारण बसली. त्याचवेळी प्रेमप्रताप हा तरुण आपल्या नाटक कंपनीबरोबर गावात आला. पुढच्या सगळ्या घटनांमुळे हाच तो अधिकारी अशी सगळ्यांची खात्री पटत गेली. शेवटी या सगळ्या चोर लोकांना योग्य रस्ता दाखवून आणि स्वत:साठी एक सुंदरी पटकावून हे साहिबबहादुर–प्रेमप्रताप परततात.

या सरळ गोष्टीवर चेतन आनंदने पटकथेत जी धुटे चढविली आहेत, ती बघून हसावे का रडावे तेच कळत नाही.

प्रेमप्रताप आणि नाटक मंडळी म्हटल्यावर नाचगाण्यांची रेलचेल हे गृहित धरलेच होते. पण चेतन आनंदने त्यातही भेसूर विविधता आणली आहे. एक नाटक मंडळींच्या जाहिरातीचे रस्ता-गीत, एक नाटकवाले रात्री मजा करायला गेले असतानाचे देशभक्तीपर बाजार (आणि बाजारू) गीत, एक प्रत्यक्ष स्टेजवरील गीत, एक भांग-गीत आणि या सर्व गीतांच्या वेळी नाच. यातील किशोरने गायलेले स्टेजवरील गीत–'राही था मैं आवारा'–सोडून बाकी प्रकार म्हणजे डोळे, डोके व कान यांच्यावर केलेला बलात्कार होता. (अर्थात हा बलात्कार फक्त गाण्यांच्या वेळीच आहे, असे नाही.)

चित्रपटातील बहुतेक सगळ्याच पात्रांना कपड्यांविषयी दिग्दर्शकाच्या पुढील खास सूचना असाव्यात–पदर घेण्यासाठी नसून पाडण्यासाठी असतात (पहा भांग-गीत), पँटस् घालण्यासाठी नसून घसरविण्यासाठी असतात (पहा–अनेक वेळा विनोदाच्या नावाखाली केलेले वेंगरूळ प्रयत्न.) थोडक्यात कपडे हा प्रकार अंगावर ठेवण्यासाठी नसून काढण्यासाठीच असतो.

हिंदी चित्रपटांचा नायक सर्वशक्तिमान, सर्वगुणसंपन्न असतो हे त्रिकालाबाधित, स्थळ–काळ–नायक निरपेक्ष सत्य आहे. तेव्हा खरे म्हणजे देव आनंद आपल्या किरकोळ शरीराने त्याहून किरकोळ अशा प्राणांची बाजी वगैरे लावतो आणि अजित, सुधीर, रझा मुराद वगैरेंना मोडीत काढतो याबद्दल कोणी आक्षेप घेतला नसता; पण चेतन आनंदना हे काही बरे वाटेना. म्हणून त्यांनी मोहिनी विद्या नावाचा प्रकार नायकाच्या दिमतीला देऊन टाकला आहे. हा मोहिनी विद्येचा प्रकार आणि चित्रपटातील भूतनृत्य आणि श्रीकृष्णावतरण हे दोन अन्य प्रकार चेतन आनंद यांच्या मागच्या व पुढच्या बेचाळीस पिढ्यांचा उद्धार करण्यास पुरेसे आहेत.

खुद्द स्वत:चा उद्धार करून घेण्यासाठी चेतन आनंदने एक खास पात्र राखून ठेवले आहे. चित्रपटाच्या नायिकेची–मीना (प्रिया राजवंश)ची चुलत बहीण विमला हे ते पात्र. भाषेत पुल्लिंग, स्त्रीलिंग व नपुसकलिंग असे तीनच प्रकार असले; तरी व्यवहारात या व्यतिरिक्त चौथा काही तरी प्रकार अस्तित्वात असतो हे त्या विमलोबाला पाहून कळते. हे ध्यान पडद्यावर येताच माझ्या आजूबाजूच्या कित्येक प्रेक्षकांना फेफरे आले, कित्येकांना आकडीचे झटके आले; तर कित्येक झोपलेले मोठयांदा किंचाळत उठले कपडे फाडत, केस उपटत धावत सुटले. हा एकमेव पापग्रह जरी चित्रपटाच्या राशीतून वजा झाला असता तरी चित्रपट निदान असह्य झाला नसता.

ओमप्रकाश, असित सेन, आय्. एस्. जोहर, असरानी, व्ही. गोपाल, मुक्री, धुमाळ, पँटल, आगा अशी अिणोदवीरांची मोठी सेना जमा करूनही सेनापती चेतन आनंदचा चित्रपट विनोदी बनविण्याचा प्रयत्न भलताच करूण आणि केविलवाणा झाला आहे.

जाहिरातीतील 'चित्रपटाच्या आकर्षणाचा' म्हणजे पन्नाशी व साठीच्या दरम्यानचा तरूण देव आनंद. याच कथेवर आधारीत चेतन आनंदने दोन तपांपूर्वी 'अफसर' हा 'चित्रपट' काढला. त्यात नायिका असलेल्या सुरैयाला जर 'साहियवहादुर'मध्ये भूमिका द्यायची म्हटली; तर प्रियाच्या काकूची भूमिका द्यावी लागेल कदाचित; पण 'अफसर'मधील देवच 'साहिबबहादूर'मध्येही झुलपं उडवत, चॉकलेटी हसत, एक डोळा मिचकावत आणि तऱ्हेतऱ्हेचे रंगीबेरंगी पोषाख बदलत तसाच गळ टाकून बसलाय. सुरैय्याच्या जागी मासोळी फक्त बदलली.



# भरभराटीसाठीं बचत

भारतीय गणराज्याच्या या ३० व्या वर्धापन दिनी, आम्ही, देशातील सर्व नागरिकांच्या उज्ज्वल भवितव्याच्या आमच्या संकल्पित लक्ष्याच्या रोखानें अढळ निर्धारानें आणि दुप्पट उत्साहाने आगेकूच करीत आहोत.

आपण संघटित होऊन राष्ट्रीय बचतीत आपला पैसा गुंतवू या. देशाची सेवा करण्याचा हा एक मार्ग आहे. यात आपली बचत रकम वाढते. या सेवाकार्यात सर्व क्षेत्रातील ५ कोटिपेक्षा अधिक लोक अगोदरच सामील झाले आहेत.

राष्ट्रीय बचत योजनांमुळें आपणांस भांडवल उभारण्यास मदत होते, शिवाय करांच्या सवलतींसह नियमित ठराविक प्राप्तींची व्यवस्था करता येते.



## राष्ट्रीय बचत योजनांचे फायदे :

- सर्वात अधिक व्याजाचा दर
- सुरक्षितता. सरकारकडे आपला पैसा सुरक्षित राहतो.
- विशेष आकर्षणें: भाग्यवान क्रमांकांची सोडत. अल्प बचत करणाऱ्यांना मोफत विम्याचें छत्र आणि मोठी बचत करणाऱ्यांना करांत सवलती.
- एजंटस आणि महिला प्रधान यांच्या मार्फत अगदी आपल्या दाराशीं सेवा-व्यवस्था
- नामांकन करण्याची सवलत
- बचत प्रमाणपत्रे, मुदतबंद ठेवी यांचा बॅंकेकडून अथवा अन्य मार्गें कर्ज घेण्यासाठीं जामीन म्हणून उपयोग.

**राष्ट्रीय बचत संघटना**
पोस्ट बॉक्स-९६
नागपुर-४४०००१

डी. ए. वी. पी. 79/411